MGMUNIVERSITY
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR
JOIN A RESEARCH-DRIVEN UNIVERSITY
MGMU-CET 2024
16th, 17th & 18th May 2024
Admission Entrance Test
Apply Online
Visit us : www.mgmu.ac.in
Call: 9067612000, 0240-6481111

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
www.dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, ०७ मे २०२४ वर्ष दुसरे अंक ४६ पाने : ८ किंमत रु. ६/- Date : Tue. 07 May 2024 Volume 02 Issue 46 Page 8 Price : 6/-

## बाळासाहेब असते तर उबाठाला धू धू धुतले असते

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उद्धव ठाकरेंवर टीका

### काँग्रेसने २६/११ हल्ल्यातील शाहिदांचा केलेला अपमान नकली हिंदुत्ववाद्यांना मान्य, काँग्रेस का हाथ पाकिस्तान के साथ

ठाणे : विजय वड्डेटीवारांनी २६/११ हल्ल्यातील शहिद पोलिसांबाबत केलेल्या संतापजनक वक्तव्यावर काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसलेले नकली हिंदुत्ववादी गप्प का, अशी खरमरीत टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर केली. ठाण्यात आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्र्यांनी 'काँग्रेसका हाथ पाकिस्तान के साथ' असा घणाघात केला.

मुख्यमंत्री म्हणाले की, विजय वड्डेटीवारांनी २६/११ हल्ल्यातील शहिद पोलीस आणि मृत्यूमुखी झालेल्या निष्पाप मुंबईकरांबाबत केलेले वक्तव्य प्रचंज चीड आणि संताप आणणारे आहे. भारत जोडो नाही भारत तोडो यात्रा करणाऱ्या राहुल गांधींच्या नादाला लागून विजय वड्डेटीवार वेडे झाले आहेत, अशी टीका त्यांनी केली. आरएसएस ही नसानसात राष्ट्रभक्ती भरलेली संघटना आहे, असे त्यांनी सांगितले. वकिल उज्वल निकम यांनी अनेक देशद्रोह्यांना फासावर लटकवले, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

काँग्रेसचे धोरण पाकिस्तान धार्जिणे आहे. पाकिस्तानच्या वक्तव्याला हो करणारे वक्तव्य काँग्रेसच्या नेत्याकडून होणे हे दुर्दैवी आहे. मतांच्या लाचारीसाठी काँग्रेसने असेच आरोप केले होते. त्यांच्या मांडीला मांडी लावून बसताना जनाची नाही तर किमान मनाची लाज बाळगायला हवी होती, असा टोला मुख्यमंत्र्यांनी उबाठाला लगवला.



नकली हिंदुत्व, मी हिंदू आहे, मी मर्द आहे असे बोलून कोणी हिंदू होत नाही. आज हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे असते तर यांना चांगलेच धुतले असते, असे मुख्यमंत्री म्हणाले.

मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानशी बदला घेतला जाईल, अशी अपेक्षा होती, मात्र केंद्रात आणि राज्यात काँग्रेसचे सरकार होते. त्यामुळे ही अपेक्षा फोल ठरली. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर बालाकोटमध्ये सर्जिकल स्ट्राईक करुन भारत मजबूर नाही तर मजबूत देश आहे, असे दाखवून दिले. 'घुस के मारेंगे' हे बोलणारे पंतप्रधान देशाला भेटले आहेत. गुळगुळीत बोलणाऱ्या राहुल गांधी यांना बोलण्याचा नैतिक अधिकार नाही. निवडणुकीतील प्रचाराबाबत केलेल्या जाहिरातीवर काँग्रेसने आक्षेप घेण्याचे कारण काय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

'काँग्रेसचा हाथ पाकिस्तान के साथ' असे म्हणणे वावगे ठरणार नाही. जेव्हा काँग्रेस निवडणुकीत जिंकतो तेव्हा पाकिस्तानात फटाके फुटतात. जेव्हा भारत मॅच हरतो तेव्हा पाकिस्तानात फटाके फुटतात. काँग्रेस इतकी वर्ष सत्तेत असताना देखील काश्मिरबाबत बोटचेपी धोरण ठेवले. आपल्या जवानांची मुंडकी छाटून पाकिस्तानात नेत असताना काँग्रेस सरकार मूग गिळून गप्प बसले होते. आता नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानाला वठणीवर आणले आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## पाच वर्ष किती फेसबुक पोस्ट टाकल्या? कुठे जाणार होते? सत्य बाहेर आले तर बिंग फुटेल!

### देवेंद्र फडणवीसांचा अमोल कोल्हेंना इशारा

शिरुर : पाच वर्ष किती फेसबुक पोस्ट टाकल्या? कुठे जाणार होते? जर सत्य बाहेर आले तर खरा चेहरा आपल्यासमोर उघड होईल, असा इशारा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हे यांना दिला आहे. महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ शिरुर येथे फडणवीस यांची सभा झाली. या सभेत फडणवीस यांनी अमोल कोल्हे यांच्यावर जोरदार फटकेबाजी केली.

फडणवीस म्हणाले, आढळराव यांनी पक्ष बदलला नाही. मागच्या वेळी आम्ही पालघरमध्ये उद्धव ठाकरे यांनी सांगितले जागा आणि उमेदवार द्या, आम्ही आमचा खासदार उद्धव ठाकरे यांना दिला आणि पुन्हा निवडूनही आणले आहे. त्यामुळे एका विचारात काम करीत असताना या ठिकाणी पक्ष बदलला असे काही नाही, आम्ही



ठरवून हे केले आहे. समोरच्या उमेदवाराने पक्ष बदलला असे म्हणत असेल तर त्यांनी किती वेळा निष्ठा बदलली? गेल्या पाच वर्षात किती फेसबूक पोस्ट टाकल्या. किती वेळा कुठे-कुठे जाणार होते. ते कसे कसे थांबले हे सांगितले तर त्यांचा खरा चेहरा आपल्या समोर उघड होईल, असा टोला फडणवीस यांनी लगावला.

आढळरावांपेक्षा एका गोष्टीत अमोल कोल्हे हे सरस आहेत. आढळराव हे नाटककार नाहीत. आढळराव तुम्हाला नाटक जमत नाही. ते एवढे नाटकी आहेत. त्यांना रडता येतं, हसता येतं, बोलता येतं, जुमलेबाजी करता येते. पण एक लक्षात ठेवा हे मी त्यांना सुद्धा सांगतो. लोकं एकदाच नाटकाचं तिकीट घेऊन नाटक पहायला जातात. नाटक जर फ्लॉप निघालं तर पुन्हा कुणीच नाटक पहायला जात नाही. शिरुरच्या जनतेनं एकदा तिकीट घेतलं आहे.

शिरुरची लोकं खरंच हुशार आहेत. मी पाहिलं पाच वर्ष हा गडी फिरकला नाही. आता ते गावोगावी जातात. लोकंही बोलावतात स्वागत करतात, हार घालतात. समोरच्यालाही वाटतं वा.. काय स्वागत केलं अन् नंतर लोकं हळूच विचारतात पाच वर्षे कुठे होता सांगा? खरंच जबरदस्त लोकं आहेत तुम्ही असे फडणवीसांनी म्हणताच सभेतील लोकांनीही त्यांना हसून दाद दिली.

## ज्ञान आणि शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून भारताचा ऐतिहासिक लौकिक - उपराष्ट्रपती

नवी दिल्ली, ६ मे - आज ज्ञान आणि शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून भारताचा ऐतिहासिक लौकिक आहे आणि भूतकाळातील वैभव पुन्हा प्राप्त करण्याच्या दिशेने देश निर्धाराने वाटचाल करत आहे, अशी ग्वाही उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी दिली. नालंदा आणि तक्षशीला यांसारख्या संस्थांच्या वैभवशाली वारशाचा उल्लेख करत उपराष्ट्रपतींनी अलीकडच्या काळात भारताच्या शैक्षणिक परीदृश्यात घडून आलेले आमूलाग्र बदल आणि पुनरुत्थान यांचा ठळक उल्लेख केला.

दिल्ली विद्यापीठातील मुक्त शिक्षण विद्यालयाच्या (एसओएल) ६२ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित समारंभात उपस्थितांना संबोधित करताना उपराष्ट्रपतींनी कार्यरत व्यावसायिक, गृहिणी तसेच विद्यार्थ्यांसह जीवनाच्या विविध क्षेत्रांतील, वैविध्यपूर्ण घटकांतील शिकण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी परिवर्तनकारी मंच उपलब्ध करून दिल्याबद्दल उपराष्ट्रपतींनी एसओएलची प्रशंसा केली.

भूतकाळातील परिस्थितीमुळे शिक्षण घेण्यात असमर्थ ठरलेल्यांसाठी एसओएलने शिक्षणाचे द्वारे खुली करून देऊन त्यांना त्यांच्या दिनचर्येत बदल न करता शिक्षण घेण्यास सक्षम केले आहे असे त्यांनी आवर्जून नमूद केले. ज्यांना पूर्वी औपचारिक शिक्षण घेता आले नाही त्यांना शिकण्याची दुसरी संधी देऊन, ज्ञान आणि कौशल्य यांच्या माध्यमातून दुर्लक्षित समुदायांना सक्षम करून आणि त्यायोगे खऱ्या अर्थाने समावेशकतेची जोपासना करत असल्याबद्दल त्यांनी एसओएलचे कौतुक केले.शिक्षण संस्थांची आवश्यकता आणि गुणवत्ता यांना आकार देण्यात पायाभूत सुविधांपेक्षाही अध्यापकवर्गाकडे असलेल्या निर्णायक भूमिकेवर उपराष्ट्रपतींनी अधिक भर दिला.

कोणत्याही बदलासाठी शिक्षण ही सर्वात प्रभावशाली परिवर्तनकारी यंत्रणा आहे ही बाब अधोरेखित करून उपराष्ट्रपतींनी ठामपणे सांगितले की, शिक्षण हा केवळ ज्ञान मिळवण्याचा मार्ग नव्हे; किंबहुना, तो प्रगती, सक्षमीकरण आणि सामाजिक परिवर्तनाचा पाया आहे. प्रगती,समृद्धी आणि सबलीकरणाची कवाडे उघडून देणारी ती एक गुरुकिल्ली आहे. शिक्षण हा सर्वोच्च अधिकार आणि सर्वोत्कृष्ट दान आहे.शिक्षण घेण्याच्या अधिकारापेक्षा मोठा इतर कोणताही मुलभूत अधिकार नाही आणि शिक्षण देण्यासारखे इतर कोणतेही महान दान नाही, ते पुढे म्हणाले.

भारतातील शैक्षणिक परिदृश्यात नवीन शैक्षणिक धोरणाची (एनईपी) महत्त्वाची भूमिका अधोरेखीत करत, ते म्हणाले की, एनईपी म्हणजे एक परिवर्तनकारी बदल असून त्यातून विद्यार्थ्यांच्या समग्र विकासाचा आराखडा तयार करणे आणि एकविसाव्या शतकातील आव्हानांसाठी सुसज्ज असा ज्ञानी समाज निर्माण करणे ही उद्दिष्ट्ये साध्य होणार आहेत.

मुक्त शिक्षण विद्यालयांसारख्या संस्था एनईपीमध्ये संकल्पित केल्याप्रमाणे दर्जेदार शिक्षण मिळवण्याचे मार्ग विस्तारित करणे आणि या क्षेत्रात दीर्घकाळ राहून गेलेली दरी भरून काढणे यांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल असा विश्वास उपराष्ट्रपती धनखड यांनी यावेळी व्यक्त केला.

### केंद्र सरकारकडून कामगारांच्या संप करण्याच्या अधिकारावर गदा

पुणे ६ मे - केंद्र सरकार कामगार विरोधी आहे. कामगार हिताच्या कायद्याची मोडतोड केली जात आहे. कायदे मालकधार्जिणे केले जात आहेत. कामगार हा शब्दच कायमचा नष्ट होणार आहे. कामगारांचा संप करण्याचा अधिकारदेखील काढून घेण्यात आल्याचा आरोप कामगार नेत्यांनी केला. मावळ लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्या प्रचारार्थ कामगार मेळावा पार पडला.

आमदार सचिन अहिर, कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे प्रदेशाध्यक्ष कैलास कदम, सीआयटीयूचे पुणे जिल्हाध्यक्ष कॉ. अजित अभ्यंकर, अखिल भारतीय कामगार सेनेचे डॉ. रघुनाथ कुचिक, किरण मोघे, श्रमिक एकता महासंघाचे दिलीप पवार, राष्ट्रीय श्रमिक एकता महासंघाचे किशोर ढोकळे यावेळी उपस्थित होते.

## मसाल्यात लाकडाचा भुसा आणि ॲसिड! भेसळयुक्त १५ टन मसाला जप्त

### दिल्ली पोलिसांची कारवाई

नवी दिल्ली : मसाला म्हणजे चमचमीत पदार्थांची चव वाढवणारा घटक. कोणत्याही पदार्थामागची चव ही खरं तर त्यासाठी वापरलेल्या मसाल्यातच दडलेली असते. चांगला मसाला वापरला की पदार्थ छानच होतो. पण हाच मसाला भेसळयुक्त असेल तर? दिल्लीतून अशीच एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. दिल्लीच्या ईशान्य भागात पोलिसांनी मोठी कारवाई करत १५ टन भेसळयुक्त मसाला जप्त केला आहे. यामध्ये मसाल्याच्या नावाखाली लाकडाचा भुसा आणि ॲसिड वापरले जात असल्याचे समोर आले आहे.

ईशान्य दिल्लीतील करावल नगर भागामध्ये पोलिसांनी ही कारवाई केली. दोन मसाल्यांच्या कारखान्यावर पोलिसांनी धाड टाकली. त्यात तब्बल १५ टन बनावट मसाले आढळून आले. पोलिसांनी मसाला प्रोसेसिंग युनिटच्या मालकांसह तिघांना ताब्यात घेतलं आहे. दिलीप सिंह (वय ४६), सरफराज (वय ३२), खुर्सिद मलिक (वय ४२) आ संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. हे लोक मसाल्यांमध्ये भेसळ करुन स्थानिक बाजारपेठेमध्ये मालाची विक्री करत होते. मूळ मसाल्यांच्या तुलनेत कमी किंमतीमध्ये हा बनावट माल विकला जात असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

बनावट मसाल्यांसह पोलिसांनी झाडांची कुजलेली पाने, खराब बाजरी आणि तांदूळ, लाकडाची पावडर, मिरचीचे खोके, ॲसिड आणि तेल जप्त केले आहे. गुन्हे शाखेचे डीसीपी राकेश पावेरिया यांनी याबाबत माहिती दिली. दिल्लीमधील काही उत्पादक आणि दुकानदार हे संगनमत करुन वेगवेगळ्या ब्रँड्सचे बनावट मसाले विक्री करत होते. दिल्ली पोलिसांना याबाबत माहिती मिळाली होती. डीसीपी पावेरिया म्हणाले की, मिळालेल्या माहितीच्या आधारावर कारवाई करण्यात आलेली आहे. एक टीम तयार करुन १ मे रोजी छापे टाकण्यात आले.

कारवाईदरम्यान पळून जाण्याचा प्रयत्नात असलेल्या दोघांना पोलिसांना ताब्यात घेतलं. सिंग आणि सरफराज यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं असून सिंग हा कंपनीचे मालक असल्याची कबुली त्याने दिली. पुढे तपास केला असता काली खाटा रोड, करावल नगर येथे आणखी प्रोसेसिंग युनिट सापडले. तिथेच सरफराज पकडला गेला. पकडलेल्या दोघांनी २०२१ पासून मसाल्यांचा गोरखधंदा सुर केला होता.

## अक्षय तृतीयेमुळे हापूसला मागणी



पुणे, ६ मे : साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असलेली अक्षय तृतीया शुक्रवारी (दि. १०) आहे. या पार्श्वभूमीवर मार्केट यार्डातील फळ विभागात रत्नागिरी हापूसला मागणी वाढली आहे. त्या तुलनेत आवक आणि भावात १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. पुढील चार दिवस आंब्यांचे भाव तेजीत राहण्याचा व्यापाऱ्यांचा अंदाज आहे.

येथील बाजारात रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड जिल्ह्यांतून मिळून सुमारे १० ते ११ हजार पेटी आंब्यांची आवक झाली. ती मागील आठवड्याच्या तुलनेत १० टक्क्यांनी जास्त आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेत भावातही १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. बाजारात कच्च्या मालाच्या ४ ते ८ डझनाच्या पेटीला ८०० ते २५०० रुपये भाव मिळत आहे. तयार आंब्यांचा दर्जा आणि आकारानुसार ४०० ते ८०० रुपये डझन भावाने विक्री होत आहे. येत्या दोन दिवसांत आणखी मागणी वाढेल, असे व्यापाऱ्यांनी सांगितले. अक्षय तृतीयेमुळे हापूसला मागणी वाढली आहे. शहरातील किरकोळ विक्रेते आणि घरगुती ग्राहकांकडून आंब्याची खरेदी होत आहे. आंब्याचे भावही सर्वसामान्यांच्या आवाक्यात आहेत. पुढील दोन- तीन दिवसात आंब्यांना आणखी मागणी वाढेल.

## इतर देशांशी आपले संबंध चांगले नाही - प्रकाश आंबेडकर

पुणे, ६ मे - वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी आज पुण्यातील पत्रकार परिषदेत भारताच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली आहे. तसेच इतर देशांशी आपले संबंध चांगले नसल्याचे आंबेडकर म्हणालेत.

२०१४ सालच्या लोकसभा निवडणुकीत मोदी यांनी मी सगळ्यात स्ट्राँग नेता आहे, असं सांगत होते. देशाची सुरक्षा मी करू शकतो, असं वक्तव्य केलं होतं. पण आज परिस्थिती वेगळी आहे. सामान्य माणसाला याचा काहीच उपयोग झाला नाही. आज चीन आपल्या देशात घुसत आहे. राजनाथ सिंह म्हणतात की तिथले लोक भारतात यायला तयार आहेत, हे प्रचंड मोठा खोटं आहे. देशाच्या सुरक्षेला धोका आहे. नेपाळसुद्धा आता आपल्या देशाला चॅलेंज देत आहे. त्यांच्या नोटावर आपला असणारा भाग त्यांनी त्यांचा भाग



दाखवला आहे. उत्तरखंड माधला हा सगळा भाग आहे, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.

तिथल्या पंतप्रधानांनी कॅबिनेट घेऊन हा निर्णय घेतला आहे. मालदीवसोबत वैयक्तिक प्रॉब्लेम झाल्याने यांनी तिथली आर्थिक मदत बंद केली आहे. मालदीव विरोधत कारवाई केली जात आहे. सरकार यावर काहीच बोलल नाही. मालदीव आपल्या सुरक्षचेच्या दृष्टीने महत्वाचं बेट आहे. अफगाणिस्तान आता तालिबान चालवत आहे. बांगलादेश सोबतचे आपले संबंध बिघडत चालले आहेत, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

बाजूचा केवळ भूतान आपल्या सोबत इतर सगळ्या देशांशी संबंध बिघडले आहेत, हे लक्षत येत आहे. आपले शेजारी देश आपल्याला सोडून गेले आहेत. आपण एकटे पडले आहोत हा खूप मोठा धोका आहे. जर्मनी, फ्रांस हे देश देखील आपल्या पासून अंतर ठेवत आहेत. हे सरकार २०२४ मध्ये जर निवडून आल तर इतर देश कायदा करतील. इतर देशातील किती लोक आपल्या देशात राहणार याचा सगळ्यात जास्त फटका आपल्या भारताला बसणार आहे, असे आंबेडकर यांनी म्हटले आहे.

## जळगावात लग्न लावून फसवणूक करणारी आंतरराज्य महिलांची टोळी जेरबंद

जळगाव, ६ मे : कासोदा पोलीस स्टेशन परीसर तसेच जिल्हयात उपवर लग्नाच्या वयात असणाऱ्या गरजु व्यक्तींना हेरुन त्यांच्याशी घेवुन त्यांच्याशी लग्न झालेल्या व त्यांना मुले असलेल्या मुलींशी लग्न लावुन दिले जाते.या मुली लग्ना नंतर काही दिवस चांगला संसार करतात व विश्वास संपादन करुन घरातून पैसे, सोने चोरुनं पळुन जातात अशी टोळी (रॅकेट) जिल्ह्यात सक्रीय असल्याची माहिती मिळाल्याने गुप्त बातमीदारांमार्फत माहीती प्राप्त करून सदर प्रकार उघडकीस आणुन कासोदा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

या गुन्ह्यातील फिर्यादी यांने दिलेल्या फिर्यादी नुसार यातील महिला आरोपी मोना दादाराव शेंडे, वय-२५ वर्षे ,सरस्वती सोनु मगराज, वय-२८ वर्षे दोन्ही रा. रायपुर (राज्य-छत्तीसगड), अश्वीनी अरुण थोरात वय-२६ वर्षे रा. पांढुरना (मध्यप्रदेश) अशा तिघींचे कासोदा गावांतील तिन तरूणांसोबत आरोपी .सरलाबाई अनिल पाटील, वय-६० वर्षे , उषाबाई गोपाल विसपुते, वय-५० वर्षे दोन्ही नादेड ता. धरणगाव जिल्हा जळगांव यांनी लग्न लावून दिलेले होते. यातील एका आरोपी होने कबुल केले की, आम्हीं तिघींचे या पूर्वी लग्न झालेले असुन आम्हांला मुले आहेत व आम्ही तिघी फसवणुकीचा प्रकार करणे साठी घरुन महाराष्ट्रात आले असल्याची कबुली आरोपींनी दिली.

## विमाधारकांना मिळणार दिलासा, आरोग्य विम्यावरील जीएसटी कमी करणार

मुंबई : देशभरात एकीकडे निवडणुकांची रणधुमाळी तर दुसरीकडे महागाईची झळ सुरु आहे. अशातच ग्राहकांना एक आनंदाची बातमी मिळत आहे. केंद्र सरकारने एक मोठा निर्णय घेतला असून याचा ग्राहकांचा चांगलाच फायदा होणार आहे. आरोग्य विमा अधिक परवडणारा आणि आकर्षक बनवण्याच्या उद्दिष्टयाने केंद्र सरकार आरोग्य विम्याच्या प्रीमियमवरील जीएसटी कमी करण्याचा विचार करत आहे. त्यामुळे तुम्ही जर आरोग्य विमा पॉलिसी घेतली असेल किंवा येत्या काही दिवसांत ती खरेदी करणार असाल तर तुम्हाला या गोष्टीचा अधिक फायदा होणार आहे.

एका वृत्तवाहिनीने दिलेल्या माहितीनुसार, केंद्र सरकार ३०,००० रुपयांपर्यंतच्या आरोग्य विम्याच्या प्रीमियमवरील जीएसटी कमी करण्याचा विचार करत आहे. सध्याच्या १८ टक्के जीएसटी दरावरून १२ टक्के करणार असून आरोग्य विमा पॉलिसीमध्ये कुटुंबातील चार सदस्यांना १० लाख रुपयांपर्यंतचे संरक्षण मिळू शकते असे सांगितले आहे.

अर्थविषयक संसदीय स्थायी समितीने फेब्रुवारी महिन्यात विम्यावरील १८ टक्के जीएसटीचा विचार करण्याची गरज असल्याचे सांगितले होते. आरोग्य विमा परवडणारा बनवण्यासाठी, विशेषत: ज्येष्ठ नागरिकांसाठी किरकोळ विमा पॉलिसी आणि मुदतीच्या पॉलिसींवरील जीएसटी कमी करण्याबाबत विचार केला जाऊ शकतो, असे समितीने म्हटले होते.

दरम्यान, देशात जीएसटी लागू होत असताना, कोणत्याही व्यक्तीने आरोग्य विमा पॉलिसी घेतल्यास त्याला १८ टक्के जीएसटी भरावा लागेल, असा निर्णय घेण्यात आला होता. जीएसटीच्या आधीच्या काळातील १५ टक्के सेवा कराच्या तुलनेत हा दर तीन टक्के अधिक होता. आयकराच्या कलम ८०ऊ च्या नियमांनुसार, आरोग्य विमा प्रीमियमवर कर कपातीचा लाभ उपलब्ध आहे. या प्रलंबित प्रस्तावावर लोकसभा निवडणूक २०२४ पूर्ण झाल्यानंतर निर्णय घेतला जाऊ शकतो, असे एका अधिकाऱ्याने म्हटले आहे.

## तिसऱ्या टप्प्यात मंगळवारी १२ राज्यांतील ९४ लोकसभा मतदारसंघांत मतदान

### महाराष्ट्रातील ११ जागांचा समावेश - बारामतीत नणंद-भावजयीच्या लढतीकडे देशाचे लक्ष

मुंबई / नवी दिल्ली, ६ मे - भारतीय लोकशाहीचा सर्वांत मोठी उत्सव मानल्या जाणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या दोन टप्प्यांनंतर आता मंगळवारी, ७ मे रोजी तिसऱ्या टप्प्याचे मतदान होणार आहे. या तिसऱ्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा रविवारी सायंकाळी थंडावल्या. देशभरात तिसऱ्या टप्प्यात १२ राज्यांतील ९४ लोकसभा मतदारसंघांत मतदान होणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ११ मतदारसंघांचा समावेश असणार आहे. तिसऱ्या टप्प्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे, सपा नेत्या डिंपल यादव, मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या



नेत्या सुप्रिया सुळे, छत्रपती शाहू महाराज, छत्रपती उदयनराजे भोसले, केंद्रीय मंत्री नारायण राणे, काँग्रेस नेत्या प्रणिती शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस सुनील तटकरे, अनंत गीते, धैर्यशील मोहिते-पाटील, ओमराजे निंबाळकर आदींचे भवितव्य मतपेटीत बंद होणार आहे.

तिसऱ्या टप्प्यात १२ राज्यांतील १३५२ उमेदवार रिंगणात आहेत. गुजरातच्या सर्व २६ मतदारसंघांत ६५८ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. त्यानंतर महाराष्ट्रात ११ जागांसाठी ५१९ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत, अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली.

याशिवाय देशभरात आसाम ४, बिहार ५, छत्तीसगड ७, गोवा २, कर्नाटक १४, मध्य प्रदेश ८, महाराष्ट्र ११, उत्तर प्रदेश १०, पश्चिम बंगाल ४, दादरा नगर हवेली, दमण आणि दीव प्रत्येकी २, जम्मू काश्मीर १ जागांवर मतदान होणार आहे.

मंगळवारी महाराष्ट्रातील कोकण विभाग दोन, पुणे विभाग ७ तर औरंगाबाद विभाग २, अशा एकूण ११ मतदारसंघांत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या ११ मतदारसंघांत रायगड, बारामती, धाराशिव (उस्मानाबाद), लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या मतदारसंघांचा समावेश आहे. या ११ मतदारसंघांत २ कोटी ९ लाख ९२ हजार ६१६ पात्र मतदार आहेत, तर २३ हजार ३६ मतदान केंद्रे आहेत. एकूण २५८ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. या मतदारसंघांत प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, राहुल गांधी, शरद पवार, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यासह राज्यातील सर्व प्रमुख नेते मैदानात उतरले होते.

यात सर्वाधिक चर्चेत राहिलेला मतदारसंघ म्हणजे बारामती. येथे नणंद सुप्रिया सुळे आणि भावजय सुनेत्रा पवार अशी लढाई आहे. मात्र मुख्य लढाई काका-पुतणे अर्थात शरद पवार विरुद्ध अजित पवार अशी आहे. बारामतीचा गड शरद पवार राखणार की अजित पवार विजयी धडक देणार, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिले आहे. यामुळे रविवारी शरद पवार आणि अजित पवार दोघांनीही बारामतीत सांगता सभा घेतल्या.

www.tarunbharat.net
तरुण भारत
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.







## निवडणुकायन

### असून... नसून... सून!!!



**निवडणुकीत** 'मुद्दा' हा महत्त्वाचा असतो. तुम्ही कोणत्या मुद्यावर निवडणूक लढवता, याकडे जनतेचे लक्ष असणारच. त्यामुळे प्रत्येक पक्ष (आजकालच्या ट्रेंडनुसार 'आघाडी') आपला मुद्दा घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरत असतो. दोन वेळा सत्तेत राहिलेल्या मोदी सरकारने विकासाचा मुद्दा घेऊन २०२४ ची निवडणूक लढविण्याचे ठरविले. तसे विरोधकांनी आपआपल्या परीने मुद्दे वेगवेगळे असले तरी शेवटी मोदीविरोध हाच मुद्दा लावून धरला आहे. असे असले तरी, क्षेत्रीय स्तरावर प्रत्येक पक्षाचा वेगळा अजेंडा असतोच. बरेचदा एकमेकांवर आगपाखड करता करता हे पक्ष आपल्या प्रतिस्पर्ध्याला मुद्दा देऊन जातात.

अगदी सुरुवातीला लालू यादव म्हणाले की, मोदींना स्वत:चा परिवार आहेच कुठे? असे म्हणताच मोदींच्या महापरिवारात इतके लोक जोडले गेले की, विरोधकांना स्वत:च्याच जाळ्यात अडकल्यासारखे वाटले असावे. आता हीच गत शरद पवार आणि त्यांची सुकन्या सुप्रिया सुळे यांची झाली आहे. मुलीच्या विरोधात सूनबाई सुनेत्रा पवार उभ्या ठाकल्याने पवारांनी सहाजिकच मुलीची बाजू उचलून धरली. सून काय दुसऱ्या घरची मुलगी, असे म्हणत 'सुजाण' आणि 'परम अनुभवी' म्हणवल्या जाणाऱ्या शरद पवारांनी स्वत:चीच गोची करून घेतली म्हणायची.

आपली संस्कृती इतकी उदात्त आहे की, दुसऱ्या कुळातील मुलीला आपल्या कुळात घेऊन तिला गृहलक्ष्मीचा मान दिला जातो. लग्नविधींमध्ये सिमांत पूजनाला सासू-सासरे जसे जावयचे पाय धुतात तसेच भावी सुनेचेही पाय धुतले जातात. लक्ष्मी म्हणून तिला मान देण्याची ही परंपरा आहे. विशेष म्हणजे, लग्नविधीतील पाठवणीच्या आधीचा विधी म्हणजे 'झाल'. यात वर-वधुच्या कुळातील सर्व लोक समोरासमोर बसतात आणि या कुळातील लोक आपली लेक समोरच्यांच्या कुळात देतात. तेव्हा मोठी परडी (जी मुलीच्या जबाबदारीचे प्रतीक असते) मुलाच्या कुटुंबीयांच्या डोक्यावर ठेवली जाते. कदाचित पवारांकडे अजित दादांच्या लग्नात हा विधी झालाच नसावा. म्हणूनच तर लग्नाला ३५ वर्षांपेक्षा जास्त काळ उलटलेल्या सुनेत्राताईंना पवारांनी अजूनही सून म्हणून स्वीकारलेले नाही. याचा त्रास त्या सुनेच्या मनाला होतच असावा, पण पवारांनी मात्र बोलून नसते दुखणे ओढवून घेतले आहे. आता सारेच त्यांच्यावर तुटून पडले आहेत. का हो सून परकी कशी, असा सवाल केवळ विरोधी पक्षातील चित्राताई वाघच नव्हे, तर त्यांच्या पक्षातील काही बायकाही आपसात कुजबूजत विचारताना दिसतात.

मुलगी तर लाडकी असतेच हो... यात दुमत नाही. मात्र, सून दोडकी करून कसे चालणार? बरे झाले, पवार कुटुंबीयांच्या चुली वेगळ्या आहेत आणि अजितदादा-सुनेत्राताई कुटुंब वत्सल आहेत, नाहीतर प्रचार सभेत असे बोलल्यानंतर पवारांना घरात जे सहन करावे लागले असते, त्याच्या समोर त्यांचे राष्ट्रपती, पंतप्रधान न होण्याचे दु:ख फारच छोटे वाटले असते.

पवारांना आता निवडणूक उलटल्यानंतरही याविषयी टोमणे ऐकावे लागणार, हे नक्की. मुळात, आज सून आणि मुलगी यात भेद करण्याचा काळच राहिलेला नाही. सुनेची अवहेलना करून चालत नाही आणि मुलीलाही तिचा संपत्तीतील वाटा द्यावाच लागतो. असे असताना शरद पवारांसारख्या दिग्गज नेत्याने स्वत:विरुद्ध बोलायला इतका मोठा मुद्दा देणे म्हणजे ऐन युद्धाआधी कर्णाने आपले कवच-कुंडल दान देण्यासारखे आहे. आता भोगा परिणाम...सांगता कोणाला?

# नड्डा, मालवीय यांच्याविरोधात काँग्रेसची आयोगाकडे तक्रार

**नवी दिल्ली, ५ मे**

भाजपाने आपल्या समाज माध्यम खात्यावर एक चित्रफीत टाकत अनुसूचित जाती आणि जमातीच्या विशिष्ट उमेदवाराला मतदान न करण्याबाबत सांगितल्याचा आरोप करीत काँग्रेसने भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, माध्यम प्रभारी अमित मालवीय आणि कर्नाटकमधील भाजपाचे प्रदेशाध्यक्ष बी. वाय. विजयेंद्र यांच्या विरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

याबाबत काँग्रेसचे मीडिया प्रभारी रमेश बाबू यांनी सांगितले की, भाजपाने समाज माध्यम मंचावर एक चित्रफीत प्रसारित केली. यात एससी, एसटी समाजाविरुद्ध द्वेष पसरविण्याचा प्रयत्न केला आहे. या व्हिडीओचा उद्देश लोकांमध्ये शत्रुत्वाची भावना वाढवणे आणि एससी, एसटी समाजाविरुद्ध द्वेष पसरवण्याचा आहे. हा व्हिडीओ आचारसंहितेचा भंग करणारा आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या हे एका विशिष्ट धर्माचे समर्थन करणारे आणि एससी, एसटी समाजाचे शोषण करणारे असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

कर्नाटक भाजपाच्या अधिकृत एक्स अकाऊंटवर एक चित्रफीत शेअर करण्यात आली, ज्यात राहुल गांधी आणि मुख्यमंत्री सिद्धरामय्या ॲनिमेटेड पात्रांच्या रूपात दाखवले आहेत. पक्ष्यांच्या घरट्यात एससी, एसटी आणि ओबीसी नावाची अंडी ठेवल्याचे दिसत आहे. पण, राहुल गांधी त्यात मुस्लिम नावाची अंडी घालतात. मुस्लिम नावाची पिलं अंड्यातून बाहेर पडल्यावर ती इतर तीन पिलांपेक्षा खूप मोठी दिसतात. त्यानंतर ते सर्व निधी एकटेच खातात आणि उरलेली पिले घरट्यातून बाहेर फेकून देतात. (वृत्तसंस्था)



सातारा येथे रविवारी भाजपाचे उमेदवार उदयनराजे भोसले यांच्या प्रचारासाठी आयोजित जाहीर सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नेते मंडळी

# निकालानंतर देशाचे नेतृत्व बदलणार : शरद पवार

## ४०० पार जाणार नाही, जनतेत मोदींची दहशत

**पुणे, ५ मे**

भाजपाने '४०० पार'चा कितीही प्रचार केला, तरी त्यांना तितक्या जागा मिळणार नाही. लोकसभा निवडणुकीच्या निकालात वेगळे चित्र पाहायला मिळेल. निकालानंतर देशाचे नेतृत्व बदलणार आहे. जनतेच्या मनात मोदी नसून, त्यांच्याबद्दल दहशत असल्याची टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली.

दौंड येथे प्रचारसभेला संबोधित करताना पवार म्हणाले, माझी खात्री आहे की, सध्या लोक गप्प आहेत. कारण, लोकांमध्ये मोदींची दहशत आहे. त्यामुळे लोक कोणतीही प्रतिक्रिया देताना दिसत नाही. पण, लोक मतदानातून उत्तर सडेतोड उत्तर देतील.

भारतात २००४ मध्ये भाजपाने 'शायनिंग इंडिया' मोहिमेतंर्गत लोकसभा निवडणुकीचा प्रचार सुरू केला होता. या निवडणुकीत अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्त्वाखालील भाजपा विजय होईल, अशी खात्री अनेकांना होती. मात्र, तेव्हा माझे मत वेगळे होते. अखेर लोकसभा निवडणुकीचा निकाल समोर आला, तेव्हा माझे मत खरे ठरले होते. यावेळी सुद्धा तसेच होणार असून, मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्याचा कितीही आटापिटा केला, तरी त्यांना पराभवाला सामोरे जावे लागेल, असे भाकीत पवारांनी केले.

### सत्ता जाण्याच्या भीतीने करतात आरोप

पवार म्हणाले, मोदींना जे साध्य करायचे आहे, ते साध्य करण्याची स्थिती सध्या नाही. लोकांचा पाठिंबा घसरतो आणि जेव्हा सत्ता आपल्या हातातून जाईल, अशी स्थिती निर्माण होते, तेव्हा टोकाची भूमिका घेतली जाते. अशावेळी संबंधित व्यक्तीचे स्वत:वर नियंत्रण राहत नाही. हे नियंत्रण सुटल्यामुळे पंतप्रधानपदाची गरिमा ठेवण्याचे स्मरणही मोदींना होत नाही. त्यामुळे ते वाट्टेल तसे आरोप करीत सुटले आहेत.

### दहा वर्षांत एकही पत्रपरिषद का नाही?

मोदी यांची पद्धत पाहता ते जनमानसासमोर आपण केलेले काम मांडण्यासाठी पुढाकार घेत नाही. मनमोहनसिंग पंतप्रधान असताना वर्षातून एकदा प्रसारमाध्यमांशी बोलून आपण काय निर्णय घेतले, याची माहिती देत होते. पण, मोदींनी १० वर्षांमध्ये एकदाही पत्रपरिषद का घेतली नाही, असा सवाल पवार यांनी केला. (वृत्तसंस्था)

# देशाच्या विकासासाठी मोदींशिवाय पर्याय नाही

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**सातारा, ५ मे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे वैश्विक नेतृत्व आहे. सर्व समाजाला पुढे घेऊन जाण्याची आणि देशाचा विकास करण्याची ताकद आजच्या घडीला मोदींशिवाय इतर कुठल्याही नेत्यात नाही. मोदींसारख्या जागतिक नेतृत्वाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्यासाठी उदयनराजेंना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

वाई येथे रविवारी प्रचारसभेला संबोधित करताना फडणवीस म्हणाले, लोकांना वेगवेगळ्या गोष्टी सांगून फसवणारे शरद पवार कोल्हापुरात शाहू महाराजांना बिनविरोध करण्याची भाषा करतात. या नेत्याने साताऱ्यात दुटप्पीपणा दाखवला आहे. शौचालयात पैसे खाणाऱ्या उमेदवाराला उदयनराजेंच्या विरोधात सातारा लोकसभेची उमेदवारी दिली, त्याची पिपाणी केल्याशिवाय उदयनराजे थांबणार नाही. सत्ता होती तेव्हा जनतेला वाऱ्यावर सोडलेल्या नेत्याने मोदींना ऊसातले काय कळते, अशी टिंगल केली होती. त्याच मोदींनी शेतकऱ्यांच्या मालकीच्या साखर कारखान्यांवर असलेला आयकर रद्द करून शेतकऱ्यांची सुटका केली. मोदींना समजले ते तुम्हाला समजले नाही.

जनतेच्या मनातील स्पंदन, रुदन हे मोदींना थेट समजते. मोदी यांना विरोध करणारे राहुल गांधी आणि शरद पवार केवळ तोंडाच्या वाफा दौडवतात, त्यांना जनतेच्या समस्यांची जाणीव नाही. (वृत्तसंस्था)

### विरोधकांच्या गाडीला फक्त इंजिन, डबे गायब

फडणवीस विरोधकांवर टीका करताना म्हणाले, महायुतीची गाडी ही सर्वसामान्यांना बरोबर घेऊन जाणारी आहे. मात्र, विरोधकांच्या गाडीला फक्त इंजिन आहे, डबेच नाहीत. राहुल गांधींच्या इंजिनात फक्त सोनिया आणि प्रियांकांची जागा आहे. शरद पवारांच्या इंजिनात सुप्रिया सुळेंशिवाय कोणी नाही आणि उद्धव ठाकरेंच्या इंजिनात आदित्यशिवाय कोणीही नाही. ते तुम्हाला कुठेही जागा देऊ शकत नाहीत आणि तुमचा विकास करू शकत नाहीत.



आसामच्या कामरूप जिल्ह्यात अपक्ष उमेदवार डुलू अहमदच्या प्रचारासाठी रोड शो करताना अभिनेत्री मंदाकिनी आणि अन्य सेलिब्रिटी

# निवडणुकीनंतर मशालीची होणार चिलीम

## मुख्यमंत्री शिंदे यांचा उद्धव ठाकरेंना टोला

**कोल्हापूर, ५ मे**

धनुष्यबाणाचे बटन दाबून उद्धव ठाकरेंचा टांगा पलटी करायचा आहे. ठाकरेंची मशाल निवडणुकीनंतर चिलीम होणार असल्याचा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना प्रचारसभेतून लगावला.

कोल्हापूर लोकसभेचे शिवसेनेचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ कागलमध्ये रविवारी सकाळी आयोजित सभेत शिंदे म्हणाले, काँग्रेसचे उमेदवार मतदारसंघ सोडून पळत आहेत. २०१४ नंतर एक तरी बॉम्बस्फोट झाला आहे का, देशासाठी २४ तास काम करणारा पंतप्रधान पाहिजे की परदेशात जाऊन गार गार वारा खाणारा, हे जनतेने ठरवायचे आहे.

मोदींनी १० वर्षांत केलेले काम आणि ६० वर्षे काँग्रेसने देशाला खड्ड्यात घातलेला काळ पाहा. घरात बसलेल्या व्यक्तीला मत देणार का, फेसबुकवर बोलणाऱ्या व्यक्तीला मतदान करणार, स्वतःच्या स्वार्थासाठी, खुर्चीसाठी काँग्रेसला डोक्यावर घेतले, असे म्हणत शिंदे यांनी ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला. (वृत्तसंस्था)



कोल्हापूर येथील जाहीर सभेत जनतेला अभिवादन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे. सोबत स्थानिक पदाधिकारी व नेते

### जनतेची साथ महायुती, मोदींसोबतच

विजयाचा विश्वास व्यक्त करीत शिंदे म्हणाले, हसन मुश्रीफ, समरजित घाटगे, संजय मंडलिक असा त्रिवेणी संगम येथे झाला आहे. त्यामुळे कोल्हापुरातील महायुतीच्या दोन्ही जागा मोठ्या फरकाने जिंकणार, याचा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात महायुतीला प्रतिसाद मिळाला, तसाच प्रतिसाद तिसऱ्या टप्प्यातील मतदानावेळी मिळेल. महायुती व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाच जनतेची साथ असून, आम्ही केलेल्या कामाची पोचपावती जनता दिल्याशिवाय राहणार नाही.

# प्रचारादरम्यान उमेदवाराने चक्क महिलेच्या कानशिलात लगावली

**निझामाबाद (तेलंगणा), ५ मे**

एरवी जिंकून आल्यानंतर खासदार, आमदार सामान्यांना विचारतही नाही. मात्र, प्रचारादरम्यान घरोघरी जातात, हात जोडतात, वृद्ध असतील तर पाया पडतात. मात्र, काँग्रेसच्या एका उमेदवाराने मतदारांची एवढीही तमा बाळगली नाही. काँग्रेसचे नेते तथा निझामाबाद लोकसभा मतदारसंघातील उमेदवार टी. जीवन रेड्डी यांनी प्रचारादरम्यान एक वृद्ध महिलेला कानशिलात लगावल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

आरमूर विभागात लोकसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी टी. जीवन रेड्डी यांच्यापुढे एक महिला आली. माझ्याकडे ना घर आहे, ना मला कुठलीही पेन्शन मिळते. तिने त्यांना दया करण्याची विनंती केली. तुम्हाला सर्वकाही मिळेल, असे म्हटल्यावर रेड्डी यांनी तुम्ही कुणाला मतदान करणार आहात, असा प्रश्न विचारला. त्यावर महिलेने माझी फुलाला मत देण्याची इच्छा असल्याचे म्हटले. महिलेचे उत्तर ऐकून रागावलेल्या रेड्डी यांनी महिलेला थापड लगावली. याबाबतचा व्हिडीओ व्हायरल झाला असून, त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. (वृत्तसंस्था)



> व्हायरल झालेल्या व्हिडीओत मी वृद्धेला थापड मारली नाही. प्रेमाने तिच्या गालाला हात लावला.
> — टी. जीवन रेड्डी, काँग्रेस उमेदवार

> इंडिया आघाडी सत्तेत आल्यास टी. जीवन रेड्डी हे केंद्रीय कृषिमंत्री होतील, असे तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी म्हणतात, पण जीवन रेड्डी यांचे वृद्ध महिलांबाबतचे वर्तन निंदनीय आहे.
> — विष्णू वर्धन रेड्डी, भाजपा नेते

# गांधीनगरमध्ये अमित शाह मताधिक्याचा आपलाच विक्रम मोडणार का?

**श्यामकांत जहागीरदार**

**नवी दिल्ली, ५ मे**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या गांधीनगर मतदारसंघात ७ मेला तिसऱ्या टप्प्यात मतदान होत आहे. मागील वेळी साडेपाच लाखांनी निवडणूक जिंकणाऱ्या शाह यांनी यावेळी दहा लाखांनी निवडणूक जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अमित शाह या मतदारसंघातून देशात विक्रमी म्हणजे साडेपाच लाखांहून अधिक मतांनी विजयी झाले होते. त्यावेळी शाह यांना ८ लाख ९४ मते, तर काँग्रेस उमेदवार सी. जे. चावडा यांना ३ लाख ३७ हजार मते मिळाली होती. गेल्या पाच वर्षांत गृहमंत्री म्हणून केलेल्या धडाकेबाज कामगिरीमुळे शाह यांची लोकप्रियता वाढली आहे. त्यामुळे शाह यावेळी किती मताधिक्याने जिंकतील, साडेपाच लाख मतांनी विजयी होण्याचा आपलाच विक्रम मोडतील का, एवढाच चर्चेचा मुद्दा आहे.

यावेळी शाह सलग दुसऱ्यांदा येथून निवडणुकीच्या रिंगणात आहे. त्यांचा मुकाबला काँग्रेसच्या सोनल शाह यांच्याशी आहे. सोनल शाह महाराष्ट्राच्या सहप्रभारीही आहेत. २०१९ मध्ये शाह यांनी पहिल्यांदा गांधीनगरमधून लोकसभेची निवडणूक लढवली होती. गृहमंत्री म्हणून मोदी सरकारमध्ये दुसऱ्या स्थानावर असलेले अमित शाह भाजपात चाणक्य म्हणून ओळखले जातात. गृहमंत्री म्हणून आपल्या कार्यकाळात शाह यांनी जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम हटवण्यासह अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

पंतप्रधान मोदींखालोखाल अमित शाह यांच्यावर भाजपाच्या प्रचाराची धुरा आहे, त्यामुळे यावेळी उमेदवारी अर्ज भरल्यानंतर फारकमी दिवस आपल्या मतदारसंघात प्रचारासाठी आले होते. गांधीनगरमधून विजयाची खात्री असल्यामुळे ते देशभर भाजपा उमेदवारांच्या प्रचारात व्यस्त आहेत.

गेल्या ३५ वर्षांपासून गांधीनगर मतदारसंघ भाजपाचा गड म्हणून ओळखला जातो. येथे विधानसभेचे सात मतदारसंघ आहे आणि सातही मतदारसंघात भाजपाचे आमदार आहेत. १९८४ मध्ये या मतदारसंघात काँग्रेसने शेवटचा विजय मिळवला होता. तेव्हा काँग्रेसचे जी. आय. पटेल विजयी झाले. त्यानंतर या मतदारसंघातून काँग्रेसला कधीच विजय मिळाला नाही. १९८९ मध्ये या मतदारसंघात भाजपाने पहिल्यांदा विजय मिळवला. शंकरसिंह वाघेला या मतदारसंघातून विजयी झाले होते.



# देशाच्या गृहमंत्र्यांचा मतदारसंघ हीच गांधीनगरची ओळख

**नवी दिल्ली, ५ मे**

१९५२, १९५७ आणि १९६२ अशा देशातील पहिल्या तीन सार्वत्रिक निवडणुकीत गांधीनगर लोकसभा मतदारसंघ अस्तित्वात नव्हता. १९६७ मध्ये हा मतदारसंघ अस्तित्वात आला. गांधीनगर लोकसभा मतदारसंघ हा देशाच्या गृहमंत्र्याचा मतदारसंघ झाला आहे.

१९६७ आणि १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघातून काँग्रेसचे सोळंकी जिंकले. १९७७ च्या निवडणुकीत जनता पक्षाचे पुरुषोत्तम मावळणकर विजयी झाले. मावळणकर नंतर लोकसभेचे सभापती झाले होते. १९८० मध्ये काँग्रेसचे अमृत पटेल या मतदारसंघातून निवडणूक आले.

माजी उपपंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते लालकृष्ण अडवाणी यांनी गांधीनगर लोकसभा मतदारसंघातून सहावेळा निवडणूक जिंकली. अडवाणी यांनी १९९१ मध्ये पहिल्यांदा गांधीनगरमधून लोकसभा निवडणूक जिंकली. १९९६ मध्ये अडवाणी यांनी हा मतदारसंघ अटलबिहारी वाजपेयी यांच्यासाठी सोडला; मात्र दोन ठिकाणांहून निवडणूक लढलेल्या वाजपेयी यांनी जिंकल्यानंतर लखनौ लोकसभा मतदारसंघ कायम ठेवत गांधीनगरच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला.

वाजपेयींच्या राजीनाम्यामुळे १९९६ मध्ये या मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसने सुपरस्टार राजेश खन्ना यांना उमेदवारी दिली होती, पण भाजपा उमेदवार विजयभाई पटेल यांनी त्यांचा पराभव केला. १९९९ मध्ये काँग्रेसने माजी मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांना उमेदवारी दिली होती, पण लालकृष्ण अडवाणी यांच्यासमोर त्यांचा टिकाव लागला नाही.

१९९८ मध्ये अडवाणी गांधीनगर मतदारसंघात परतले. त्यानंतर १९९८, १९९९, २००४, २००९ आणि २०१४ अशा सलग पाच निवडणुका त्यांनी या मतदारसंघातून जिंकल्या. २०१९ मध्ये हा मतदारसंघ अमित शाह यांच्याकडे आला. गांधीनगर हा देशाच्या गृहमंत्र्याचा मतदारसंघ म्हणायला हरकत नाही. कारण, आधी या मतदारसंघातून निवडून येणारे अडवाणी वाजपेयी सरकारमध्ये गृहमंत्री होते, तर आता शाह मोदी सरकारमध्ये. (तभा वृत्तसेवा)

## लेकीच्या संरक्षणासाठी आईने केलेली प्रार्थना देवी ऐकणार आणि अवतरणार 'आदिशक्ती'

मुंबई : सज्जनांसाठी देवी आणि दुर्जनांसाठी काळ, सहज नाही लागणार ह्या आदिशक्तीचा ठाव, असं म्हणत 'सन मराठी'ने नुकताच 'आदिशक्ती' मालिकेचा नवा प्रोमो रिलीज केला आहे, ज्यामध्ये अभिनेता सुयश टिळक महत्त्वाच्या भूमिकेत दिसतोय. कोण कोणाच्या विरोधात उभं राहिल, कोण कोणाचा शत्रु बनेल हे कधीच कोणी सांगू शकत नाही आणि वडीलांची शत्रु स्वत: त्यांची मुलगी असेल तर काय... भितीने थरकाप उडेल अशी घटना चिमुकल्या जीवाशी घडणार असेल तर आईचं काळीज घाबरणारच... पण आई लेकीच्या संरक्षणासाठी आदिशक्तीकडे प्रार्थना करणार आणि तिच्या पाठीशी उभी राहणार दैवी शक्ती, हे या प्रोमोमधून दाखवण्यात आले आहे.

रोमांचक, थरारक, कथेशी खिळवून ठेवणारी कथा घेऊन 'सन मराठी' वाहिनी नव्या पध्दतीने प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी पुन्हा सज्ज झाली आहे. दैवी शक्ती नेहमी चांगल्या कर्माच्या, माणसांच्या पाठीशी उभी असते हे या मालिकेतून अधोरेखित करण्यात आले आहे. तसेच सुयश टिळक, पल्लवी पाटील, सावी केळकर, अंबरिश देशपांडे, सुश्रुत आदी कलाकारांचा अभिनय अनुभवण्याची संधी प्रेक्षकांना मिळतेय. एकंदरीत ही नवी मालिका देखील प्रेक्षकांच्या घराघरांत आणि मनात हक्काचं स्थान निर्माण करणार हे नक्की.

नक्की पाहा 'आदिशक्ती' येत्या ६ मे पासून सोमवार ते शनिवार रात्री ८:३० वाजता फक्त सन मराठी वर.

## सेंको गोल्ड अँड डायमंड्सच्या बांगडी महोत्सवात २००० हून अधिक पर्याय आणि २०० नवीन डिझाईन्स

मुंबई – सेंको गोल्ड अँड डायमंड्स या ८० वर्षांहून अधिक वर्षांचा वारसा असलेल्या आघाडीच्या ज्वेलरी विक्रेत्याने अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर बांगडी महोत्सव आणि विशेष ऑफर सुरू केल्या आहेत. ब्रँडची भारतभर १५८ पेक्षा जास्त स्टोअर्स आहेत. टीआरए ए च्या ब्रँड ट्रस्ट अहवाल २०२४ मध्ये सलग चौथ्या वर्षी भारतातील दुसरा सर्वात विश्वासार्ह ज्वेलरी ब्रँड म्हणून स्थान देण्यात आले आहे. अक्षय्य तृतीयेचा सण केवळ पश्चिम बंगालमध्येच नाही तर संपूर्ण भारतात मोठ्या भक्तीभावाने साजरा केला जातो. हा दिवस सोने खरेदी करण्यासाठी आणि इतर मौल्यवान वस्तूंमध्ये गुंतवणूक करण्यासाठी सर्वात शुभ काळ मानला जातो. असे मानले जाते की यामुळे घरामध्ये सौभाग्य आणि समृद्धी येते. सेंको गोल्ड अँड डायमंड्स आपल्या ग्राहकांना ८ एप्रिल ते १२ मे २०२४ पर्यंत विशेष सवलत देत आहे. या अंतर्गत, ग्राहकांना डायमंड ज्वेलरी आणि पोल्की ज्वेलरीच्या शुल्कावर ६०% पर्यंत सूट मिळेल. एवढेच नाही तर संपूर्ण भारतभर हिऱ्याच्या मूल्यावर ५% पर्यंत सूट मिळेल. याव्यतिरिक्त, ब्रँड मेकिंग चार्जेस आणि स्पर्धात्मक सोन्याच्या दरांवर २५% पर्यंत सूट देत आहे.

## केश किंग ॲन्टि-हेअरफॉल शॅम्पूने पलक तिवारीची 'चमक' शिल्पा शेट्टीच्या 'तेजा' सोबत नव्या जोडीचे सादरीकरण

कोलकाता : केश किंग ॲन्टि-हेअरफॉल शॅम्पूच्या आपल्या नव्या जाहिरातीमध्ये पलक तिवारी, सिनेमा क्षेत्रातील उद्योन्मुख तारा हीची तरूण ऊर्जा आणि शिल्पा शेट्टीचे चिरस्थायी सौंदर्य एकत्र आणले आहे. वर्ष २०१९ पासून शिल्पा शेट्टी आमची ब्रँड ॲम्बॅसेडर आहे आणि केश किंग आयुर्वेद ऑइल, भारताच्या नं. १ हेअर फॉल एक्सपर्टला एंडॉर्स करीत आहे. राजू हिराणी फिल्म्सद्वारे निर्मित, या नव्या केश किंग ॲन्टि-हेअरफॉल शॅम्पूचा कमर्शिअल मध्ये या दोन्ही नट्या अगदी मनोरंजक संवाद करताना दिसतील आणि उडे जब जब जुल्फे तेरी सारख्या जुन्या काळातल्या गाण्याने याला आणखी खास बनवले आहे. हे कमर्शिअल मे महिन्यापासून प्रासारित केले जाईल. या नव्या कमर्शिअलबद्दल सांगताना श्रीमति प्रीती सुरेका, ईमामी लिमिटेड, म्हणाल्या, 'केश किंग हा केस आणि स्कॅल्पची काळजी घेणारा एक ब्रँड आहे आणि हा आयुर्वेदावर आधारीत आहे.

## क्सालिओनएँ क्टिव्हची शक्ती असलेल्या एफिकॉनएँ या नावीन्यपूर्ण उत्पादनाद्वारे शेतकऱ्यांसोबत बांधिलकी

मुंबई : उत्पादनक्षमता आणि पिकाचे उत्पादन यामध्ये ३५ ते ४०% इतके प्रचंड नुकसान निर्माण करणाऱ्या रस शोषक किटकांनी भारतातील शेतकरी पिकांसमोर एक लक्षणीय संकट उभे केले आहे. भारतातील शेतकरी आता एफिकॉनएँ ह्या बीएएसएफच्या आज सादर करण्यात आलेल्या नवीन किटकनाशकाच्या साह्याने ह्या आव्हानाचा सामना करु शकतात. एफिकॉनला विशेष रसायनामधील क्सालिऑनएँ ह्या बीएएसएफच्या नव्या सक्रीय घटकाची शक्ती मिळालेली आहे. बाजारपेठेतील वर्तमान उत्पादनांच्या बाबत ज्ञात असणारी कोणतीही विरुध्द प्रतिकारक्षमता नसल्याने एक श्रेष्ठ दर्जाचे किटकनाशक प्रतिबंध व्यवस्थापन साधन ठरणाऱ्या किटकनाशकांच्या (ग्रुप ३६- पायरीडाझीन) ह्या संपूर्ण नवीन गटाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या नव्या आयआरएसी ग्रुप ३६ अंतर्गत बाजाररपेठेत सादर करण्यात आलेल्या पहिल्या काही संयुगांपैकी एफिकॉन हे एक अनोखी कार्यपध्दती असणारे किटकनाशक आहे. एफिकॉन किटकनाशक हे पहिल्यांदा ऑस्ट्रेलियात वर्ष २०२३ मध्ये सादर करण्यात आले. चिवट रस शोषक किटकांवर नियंत्रण मिळविण्यास शेतकऱ्यांना मदत करील असे नवे नावीन्यपूर्ण रसायन प्राप्त करणाऱ्या जगातील सुरुवातीच्या काही देशांपैकी एक भारत आहे. एशिया पॅसिफिक स्ट्रॅटेजीच्या अनुसार बीएएसएफ खास स्थानिक बाजारपेठांच्या गरजानुसार रसायने विकसित करीत आहे. बीएएसएफ मध्ये आम्ही प्रत्येक गोष्ट शेतीवरच्या प्रेमापायी करतो.

## श्री क्षेत्र जैनगिरी (जटवाडा) येथे अमावस्या निमीत्त पंचामृत अभिषेक व महाप्रसादाचे आयोजन

औरंगाबाद प्रतिनिधी – शहरापासुन १२ कि.मी.अंतराव असलेल्या हजारो जैन बांधवांचे श्रध्दास्थान श्री.१००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे दिनांक ८ मे गुरुवार सकाळी १० वाजता मुलनायक श्री.संकटहर पार्श्वनाथ भगवंताचा पंचामृत णमोकार भक्ती मंडळचा सानिध्यात अभिषेक करण्यात येणार आहे. सर्व उपस्थित समाज बांधवांना ११ ते २ दरम्यान श्रीमती रामकुंवरबाई पापालालजी सौ मगंलादेवी-महावीर सौ उज्वलादेवी-मनोज सौ सायली-अक्षय प्रविण संकेत विपुल शुभम मयुरी भव्या सेठी परिवार अरिहंत नगर , छत्रपती संभाजीनगर , मुंबई वतीने महाप्रसाद दिला जाणार आहे. ८ मे रोजी चैत्र अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा होवुन सायंकाळी भगवंताची आरतीही करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष विनीत लोहाडे व महामंत्री प्रमोद पांडे दिलीप सेठी यांनी केले आहे. श्री. क्षेत्र जैनगिरी येथे महिन्याच्या प्रत्येक अमावस्येला भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येत असतो तसेच यावेळी भाविकांकडुन महाप्रसादाचेही आयोजन केले जाते.

## बेलस्टार मायक्रोफायनान्स ची सेबीकडे फाइल

छत्रपती संभाजीनगर- बेलस्टार मायक्रोफायनान्स लिमिटेडने बाजार नियामक सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाकडे त्यांचा ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल केला आहे. कंपनी मायक्रो एंटरप्राइज, लघु उद्योग, ग्राहकोपयोगी वस्तू, सण, शिक्षण आणि आपत्कालीन कर्ज यासारख्या कर्ज उत्पादनांची विस्तृत श्रेणी ऑफर करते. इक्विटी शेअर्सच्या आयपीओच्या माध्यमातून (फेस व्हॅल्यू १० प्रत्येकी) एकत्रित करणे १३,००० दशलक्ष १,३०० कोटी. उभारण्याची कंपनीची योजना आहे. एकूण ऑफर आकारात समाविष्ट - इक्विटी शेअर्सचा ताज्या इश्यू पर्यंत एकत्रित १०,००० दशलक्ष १,००० कोटी (फ्रेश इश्यु) आणि इक्विटी समभागांच्या विक्रीची ऑफर एकत्रितपणे ३,००० दशलक्ष ३०० कोटी (विक्रीसाठी ऑफर) यांचा समावेश आहे. कंपनीने नवीन इश्यूच्या निव्वळ उत्पन्नाचा उपयोग भविष्यातील भांडवलाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आर्थिक वर्ष २०२५ मध्ये पुढील अंदाजे ७,६०० दशलक्ष ७६० कोटी कर्जासाठी वापरण्याचा आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी शिल्लक रक्कम वापरण्याचा प्रस्ताव दिला आहे.

# सार्वजनिक बांधकाम विभागाचे विश्रामगृह रामभरोसे

तभा वृत्तसेवा

कन्नड:- दि.०६ एप्रिल - कन्नड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले सार्वजनिक बांधकाम विभागाचे विश्रामगृह पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

या आधी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे एका कार्यक्रमानिमीत्त शहरात आले होते. त्यावेळी आपला नियोजित कार्यक्रम आटोपून ते थोडासा आराम होण्यासाठी जेव्हा या सर्वंजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहाकडे आले असता, या विश्रामगृहास चक्क कुलूप लावलेले होते.

या नंतर तहसिलदार विद्याचरण कडवकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयास भेट देऊन पंचनामा केला असता, या कार्यालयात एकही जबाबदार अधिकारी, कर्मचारी उपस्थित नव्हता हे विशेष. यावेळी तहसिलदार यांनी संबंधितांना चांगलेच धारेवर धरले होते. या घटनेमुळे खडबडून जागे झालेल्या या विभागाच्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणी आपल्या मर्जीतील तसेच नेहमीच पुढे पुढे करणाऱ्या माणसाची अनधिकृतपणे नेमणूक केल्याचे कळते. मात्र तरीही हे विश्रामगृह



सतत बंदच आढळुन येते.

अलीकडेच या विश्रामगृहाची रंगरंगोटी करण्यात आली आहे. मात्र ही वरवरची मलमपट्टी दिसते. रंगकाम करणाऱ्या व्यक्तीने टिकाऊ काम करण्याऐवजी दिखाऊ काम करण्यावर भर दिला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचारी हे जिल्ह्याच्या ठिकाणाहून अपडाऊन करतात. त्यांचे नियमीतपणे कार्यालयात येणे कधीचेच बंद झाले आहे. त्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी एकमेव असलेल्या या विश्रामगृहाकडे या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नेहमीच दुर्लक्ष होत असल्याने, विश्रामगृहाच्या मुळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे.

कन्नड तालुका हा काळीभुई, घाटमाथा, नागदपट्टा अशा विस्तीर्ण विभागाचा आहे. या तालुक्यात नेहमीच कुठल्या ना कुठल्या विभागाचे, कार्यालयाचे अधिकारी व वरिष्ठ दर्जाचे अधिकारी यांची ये - जा असते. कन्नड शहरात आल्यानंतर त्यांना थांबण्यासाठी किंवा फ्रेश होण्यासाठी तसेच काही विशेष बैठका घेण्यासाठी या विश्रामगृहाशिवाय दुसरे ठिकाण नाही. याची माहिती असूनही या विभागाचे अधिकारी या विश्रामगृहाकडे लक्ष देत नाही, या ठिकाणी कधीच कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक नसतो.जर कुणी अधिकारी रात्रीच्या वेळी येथे थांबण्याच्या उद्देशाने आले तर त्यांना पदरमोड करून बाहेरील हॉटेल किंवा लॉज चा आसरा घ्यावा लागतो.एकूणच हे विश्रामगृह रामभरोसे असते याला काय म्हणावे? संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार वागण्याने आणि वेळकाढू धोरणामुळे सध्यातरी हे विश्रामगृह, 'दुरून डोंगर साजरे' असेच दिसते.

## देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयात पालक मेळावा उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर : दि. ०१ मे २०२४ रोजी देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयात पालक मेळावा आयोजित करण्यात आला आणि दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील पालक मेळाव्यास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. सुभाष लहाने यांच्या प्रास्तविकाने झाली. प्रास्तविक भाषणात संचालकांनी महाविद्यालयाचा आढावा सर्व पालकांच्या समोर सादर केला. यामध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, कला क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद व क्रीडा क्षेत्रात महाविद्यालयाचे योगदाना बाबत माहिती सादर केली. तसेच महाविद्यालयात विविध क्षेत्रातील उपलब्धी पालकां समोर अधोरेखित केल्या. यामध्ये महाविद्यालयास



मिळालेल्या राष्ट्रीय पातळीवरील नॅक, एनबीए आणि एनएबीएल या मानांकना विषयी विस्तारित स्वरूपात महत्व पालकांसमोर सादर केली आणि महाविद्यालयाच्या वैयक्तिक सांघिक यशाबद्दल अभिनंदन केले.

त्यानंतर महाविद्यालयाचे निकाल, प्लेसमेंट व इंटर्नशिप संदर्भात पालकांना माहिती दिली व त्याचे महत्व समजावून सांगितले तसेच महाविद्यालयाने या वर्षी ५७५ पैकी ४९० विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये प्लेसमेंट ची संधी उपलब्ध करून दिल्या या बाबत सविस्तर माहिती पालकांना सांगितली. तसेच उच्च शिक्षणासाठी ऋ-ढए परीक्षा पात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. येणाऱ्या सत्रापासून महाविद्यालयामध्ये अनेक नवीन उपक्रमांची सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती मेळाव्यात पालकांना दिली. पालकांनी आपल्या पाल्याशी त्यांच्या शैक्षणिक प्रगती विषयी सातत्याने संवाद साधावा असे आव्हान केले. यानंतर सर्व पालकांनी संबंधित विभागात जाऊन विभाग प्रमुख व प्राध्यापक वृंद यांच्याशी संवाद साधून आपल्या पाल्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच विभाग प्रमुखांनी पालकांना येणाऱ्या आव्हानासंबंधी तसेच कौशल्य विकास ह्या विषयी मार्गदर्शन केले. या पालक मेळाव्यास महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. सुभाष लहाने, विभागप्रमुख डॉ. सत्यवान धोंडगे, डॉ. सचिन बोरसे, प्रा. संजय कल्याणकर, डॉ. गजेंद्र गंधे, डॉ राजेश औटी, डॉ शोएब शेख, प्रा. अमरसिंह माळी व अच्युत भोसले यांची उपस्थिती होती.

## सीतेचा शोध घेताना हनुमानाने लंकेत पोहोचण्याच्या आड येणाऱ्या आव्हानांवर केली मात

छत्रपती संभाजीनगर- श्रीराम कथा विशद करणाऱ्या सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवरील 'श्रीमद् रामायण'मालिकेने प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले आहे. यापुढच्या सुंदरकांड अध्यायात प्रेक्षक बघतील की, सीतेला शोधून श्रीरामाचा संदेश तिला देण्याच्या कामगिरीवर निघालेला हनुमान आपली निष्ठा, शौर्य आणि हुशारी दाखवून मार्गक्रमण करत आहे. हनुमानाच्या मार्गात असंख्य अडचणी आहेत पण तो त्यातून मार्ग काढेल. त्याला आडवा आलेला उंचच उंच मैनाक पर्वत, त्याला संपूर्ण गिळंकृत करायला टपलेली सुरसा ही समुद्री राक्षसी, आणि हनुमानाची सावली पकडून त्याला गिळू पाहणारी सिंहिका या सगळ्यांना आपल्या हुशारीने मात देत हनुमानाचा प्रवास सुरू आहे. लंकेच्या किनाऱ्यावर पोहोचल्यावर लंकेची सुरक्षा देवता लंकिणीशी त्याचा सामना होतो.

## अवैध गावठी दारू विक्री करणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

कन्नड, दि.०७ एप्रिल - तालुक्यातील कोंडबारी पाझर तलाव नागद येथे आरोपीने गावठी हातभट्टीची दारू बनविण्यासाठी लागणारे रसायन २०० लिटर प्लास्टिकचे कॅन मध्ये वेगवेगळ्या ठिकाणी भरलेल्या जवळ बाळगून त्यापासून गावठी हातभट्टीची दारू तयार करताना कन्नड ग्रामीण पोलिसांना मिळून आला

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सागर अण्णा जाधव वय २३ वर्ष रा. बेलखेडा तालुका कन्नड हा अवैध हातभट्टी दारू बनवत असताना पोलिसांना आढळून आला आरोपीच्या



ताब्यातून १)३५०००-/ गावठी हातभट्टीचे सडवलेले १००० लिटर रसायन प्रति लिटर ३५ रुपये दराने २)४००००-/ एक बजाज पल्सर मोटरसायकल MH20GN0409 जुने वापरते किंमत अंदाजे एकूण ७५००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला,पोलिस अंमलदार दिलवरसिंग वसावे यांच्या फिर्यादीवरून आरोपी विरोधात कन्नड ग्रामीण पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ.रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल मोतींगे हे करत आहेत.

## जिल्ह्यातील निवडणूक प्रचाराचा खा. दिनेश शर्मा यांच्याकडून आढावा



अहमदनगर : जिल्ह्यातील अहमदनगर व शिर्डी लोकसभा मतदारसंघातील भाजपा महायुती उमेदवारांच्या निवडणूक प्रचाराचा आढावा उत्तरप्रदेशचे माजी उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे प्रभारी खासदार डॉ. दिनेशकुमार शर्मा यांनी नुकताच घेतला. श्री शर्मा यांनी दोन दिवस जिल्ह्याचा दौरा करून संघटनात्मक पातळीवर पदाधिकारी, कार्यकर्ते, युवा वॉरियर्स यांच्याशी संवाद साधून निवडणुकीतील बारकावे त्यांनी जाणून घेतले. अहमदनगरमध्येही युवा वॉरियर्स या मेळाव्यात त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

माध्यमांशी बोलताना डॉ.शर्मा म्हणाले की, राज्यात महायुतीला मोठे यश मिळणार असून २०१९ च्या विधानसभेत राज्यातील जनतेने दिलेल्या जनादेशाचा अवमान करणाऱ्यांना चांगलाच धडा शिकवेल. विरोधकांमध्ये आता कोणताही आत्मविश्वास राहिला नाही. विरोधी आघाडीतील प्रत्येक पक्षाला आपल्या अस्तित्वासाठी झगडण्याची वेळ आली आहे. पराभव समोर दिसू लागल्याने फतवे काढून राजकारण करण्याची वेळ त्यांच्यावर आली असल्याची जोरदार टिका शर्मा यांनी केली.

फतवे काढून वोट जिहादचे राजकारण करणे हे जनतेला मान्य नाही. समाजात सांप्रदायिकता रहावी हीच भाजपाची भूमिका आहे. विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक योजनांचा लाभ समाजातील सर्व घटकांना मिळवून देताना कधीही धर्माचा विचार करून भेद निर्माण होऊ दिला नाही. समाजातील प्रत्येक घटकांची उन्नती हाच योजना सुरू करण्यामागचा विचार आहे. पण केवळ आता मताच्या तुष्टीकरणासाठी फतवे काढले जात असतील तर सुज्ञ मतदार अशा राजकारणाला कधीही साथ देणार नाहीत. जनता राष्ट्रवादाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील वोट जिहादच्या राजकारणाला मतांची क्रांती करून उत्तर देईल असा इशारा त्यांनी दिला. उध्वव ठाकरे यांनी हिंदूत्वाचा विचार केव्हाच सोडून दिला आहे. त्यामुळे राज्यात सुरू झालेल्या फतव्यांच्या राजकारणाला विरोध करण्याची त्यांची हिम्मत नसल्याचा टोला डॉ. शर्मा यांनी लगावला. राहुल गांधी यांनी मतदार संघ बदलावर बोलताना डॉ, शर्मा म्हणाले की, डरो मत असे बोल होते. प्रियंका गांधी 'मै लढती हू लढती रहुंगी' असे देशभर सांगत होत्या मात्र निवडणुकीत त्यांची भूमिका ही केवळ राजकीय पर्यटनाची असून निवडणुका झाल्या की त्या लगेच रोम आणि इटलीत दिसतील अशी खोचक प्रतिक्रियाही त्यांनी व्यक्त केली. डॉ. दिनेश शर्मा यांनी सकाळी नगरमध्ये आल्यानंतर महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासमवेत चर्चा केली. या प्रसंगी आ. मोनिकाताई राजळे तसेच प्रदेशातून आलेले पदाधिकारी उपस्थित होते. उभयनेत्यांमध्ये मतदार संघातील निवडणुकीच्या प्रचाराबाबत सखोल चर्चा झाली.

## सोयगाव तालुक्यातील बनोटी येथे विहीरीचे खोदकाम करताना आकर्षक चकाकणारे दगड मिळाले

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.६ मे : सोयगाव तालुक्यातील बनोटी परिसरातील शेतीमध्ये विहिरीचे खोदकाम करीत असताना आकर्षक चकाकणारे दगड मिळाले आहेत.दलालांमार्फत या दगडांची गुपचूप विक्री केली जात असल्याची चर्चा परिसरात आहे.गौण खनिजाचा साठा ही शासनाची मालमत्ता असून,या प्रकरणी शनिवारी (दि.४)रात्री उशीरा पोलीस प्रशासनाने रितसर पंचनामा करीत विहीरीच्या कामास प्रतिबंध केला आहे .

बनोटी येथील रविंद्र शिवाजी शिंदे यांच्या गट क्रमांक १६९ मध्ये विहीर खोदण्याचे काम सुरू आहे.साधारण पन्नास फुटांपर्यंत विहिरीचे खोदकाम झाल्यानंतर



खोदकामामध्ये पिवळसर बदामी रंग असलेले पाणीदार दगड आढळून आले; परंतु संबंधित शेतकऱ्यास हा कोणत्या प्रकारचा दगड आहे, याची माहिती नसल्यामुळे त्यांनी ही घटना नजरेआड केली; परंतु अजिंठा परिसरात काम करणाऱ्यांना याची माहिती मिळताच या विहिरीवर गर्दी वाढू लागली. मिळालेल्या चकाकणाऱ्या मौल्यवान दगडांची खरेदी करण्यासाठी गर्दी होऊ लागली.याची माहिती महसूल व सोयगाव पोलीसांकडे गेल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक सतीष बडे,पोलीस उपनिरीक्षक रज्जाक शेख,श्रीकांत तळेगांव यांनी विहीरीची पहाणी करीत मौल्यवान दगडांचा पंचनामा केला असुन पुढील कार्यवाहीसाठी महसुल प्रशासनाकडे पाठविला आहे.

अजिंठा येथील तरुण मोठ्या प्रमाणात मौल्यवान दगड, गारगोटीच्या शिल्पांची विक्री करण्याचा व्यवसाय करतात. यावर त्यांची उपजीविका सुरू आहे; मात्र विहिरीमध्ये आढळून आलेल्या चकाकणारे दगडांची चोरटी विक्री करण्याचा गोरखधंदा जर दलालांमार्फत होत असेल तर त्यास आळा घालणे आवश्यक आहे.

## जागरुकतेपासून ते कृतीपर्यंत - या अस्थमा जागरूकता महिन्यात तज्ञांनी सशक्तीकरणासाठी सल्ला दिला

छत्रपती संभाजीनगर - शिक्षणाच्या सशक्त कृतीच्या महत्त्वावर भाष्य करताना, डॉ. सचिन एस. जोशी, चेस्ट फिजिशियन आणि इंटेन्सिव्हिस्ट, औरंगाबाद म्हणाले, संकुचित वायुमार्ग, ट्रिगर्सची वाढलेली संवेदनशीलता (जसे की धुळीचे कण, धूर, थंड हवा इ.) आणि हवेच्या मार्गातील बदल, दमा हा एक दीर्घकालीन / जुनाट आजार आहे. असाध्य असला तरी, वेळेवर निदान आणि वैद्यकीय हस्तक्षेपाद्वारे ते नियंत्रित केले जाऊ शकते. तथापि, गैरसमज, विशेषत: इनहेलेशन थेरपीबद्दल, बहुतेकदा रुग्ण त्यांच्या डॉक्टरांच्या सल्ल्याचे पालन करण्यास अपयशी ठरतात. खरं तर, भारतातील केवळ २३% रुग्ण त्यांच्या स्थितीला त्याच्या वास्तविक नावाने संबोधतात आणि बाकीचे सर्दी आणि खोकला असे म्हणतात. जागरूकता वाढवून, केवळ रूग्णांमध्येच नाही तर व्यापक समुदायामध्ये देखील, आम्ही वेळेवर निदान आणि योग्य व्यवस्थापन सुनिश्चित करू शकतो, ज्यामुळे शेवटी दम्याच्या रूग्णांसाठी चांगले आरोग्य परिणाम मिळू शकतात.

लवकर हस्तक्षेप आणि उपचारांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी शिक्षणाच्या महत्त्वावर जोर देऊन, डॉ आशिष देशमुख, पल्मोनोलॉजिस्ट, औरंगाबाद म्हणाले, दमा व्यवस्थापनाचे उद्दिष्ट इष्टतम लक्षण नियंत्रण साध्य करणे, हल्ले रोखणे आणि जीवनाच्या गुणवत्तेवर कोणताही परिणाम करणे हे आहे. हे सहसा देखभाल आणि रिलीव्हर उपचारांच्या संयोजनाद्वारे प्राप्त केले जाते. इनहेलेशन थेरपी एक कोनशिला म्हणून काम करते, जी जीवनाची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात वाढवते. किंबहुना, काही रूग्ण लोकसंख्येसाठी जसे की लहान मुले किंवा ज्येष्ठ लोक ज्यांना त्वरीत इनहेलेशनचा त्रास होतो, नेब्युलाइज्ड उपचार एक व्यावहारिक उपाय देतात, विशेषत: तीव्र तीव्रतेच्या वेळी. तथापि, निदान झालेल्या रुग्णांपैकी ९% पेक्षा कमी रुग्ण इनहेलेशन थेरपीचा वापर करतात आणि इनहेलर्स बद्दलच्या चुकीच्या समजुतींसह उपचारात अजिबात भूमिका बजावतात. मर्यादित आरोग्यसेवा प्रवेश, अपुरे उपकरण प्रशिक्षण आणि मार्गदर्शन यासारख्या इतर कारणांमुळे ही आव्हाने आणखी वाढली आहेत. म्हणून, या समस्यांचे निराकरण करण्यासाठी, आपण भारतात दम्याच्या काळजीकडे कसे जायचे यात मूलभूत बदल आवश्यक आहे.

## लहुजी सेना महायुतीच्या सोबत : कैलास खंदारे

अहमदनगर : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाचा खरा सन्मान भारतीय जनता पक्षाच्या सरकारमध्येच झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजातील उपेक्षित समाजाला न्याय देणा-या योजना सुरु करुन वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे मोठे काम केले आहे. त्यामुळेच लहुजी सेनेचे सर्व कार्यकर्ते महायुतीच्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून प्रचार यंत्रणेत काम करत असल्याची माहीती लहुजी सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना दिली. यावेळी जिल्हाध्यक्ष सुशील शिंदे तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. अहमदनगर येथे महायुतीचे उमदेवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ खंदारे यांनी विविध भागांमध्ये दौरा करुन मतदारांशी संवाद साधला. त्यानंतर निवडणूक कार्यालयात पत्रकारांशी बोलताना त्यांनी लहुजी सेनेची भूमिका स्पष्ट केली. महायुतीच्या उमेदवाराला लहुजी सेनेचे पुर्ण समर्थन असून, महायुतीचे उमेदवार खा.डॉ.सुजय विखे पाटील यांना विजयी करण्यासाठी लहुजी सेनेने सुध्दा जबाबदारी स्विकारली असल्याचे त्यांनी सांगितले.

## अग्रलेख...

# विकसित भारताच्या दिशेने वाटचाल

एकीकडे लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू असतानाच आर्थिक आघाडीवर दोन सकारात्मक बातम्या समोर आल्या आहेत. पहिली बातमी म्हणजे २०२७ पर्यंत भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याची शक्यता ख्यातनाम आंतरराष्ट्रीय संस्था 'जेफरीज'ने वर्तवली आहे. तर, २०२४ ते २०३१ या काळात या दशकाच्या अखेरपर्यंत भारताच्या अर्थव्यवस्थेचा वेग ७.६ ते ७.८ टक्के राहणार असल्याचा अंदाज नामवंत क्रेडिट रेटिंग संस्था 'डेलॉईट'ने वर्तविला आहे. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याच्या पृष्ठभूमीवर या दोन महत्त्वाच्या सकारात्मक बातम्या भारतीयांच्या दृष्टीने निश्चितच दिलासादायक व आनंददायक आहेत. मोठ्या प्रमाणात जागतिक आव्हाने असूनही आर्थिक व औद्योगिक पातळीवर मोदी सरकारने दाखविलेल्या लवचीकतेचे कौतुक करायलाच हवे. रशिया-युक्रेन युद्ध व तांबड्या समुद्रातील मालवाहतुकीचे संकट यासारख्या भूराजकीय तणावानंतरही केंद्र सरकारच्या लवचीक आणि व्यावहारिक भूमिकेमुळे एकूण निर्यात वाढीत झालेली प्रभावी वाढ ही प्रशंसनीय अशीच आहे. एकीकडे पाश्चिमात्य देश आजही त्यांच्या मध्यवर्ती बँकांनी घेतलेल्या दरवाढीच्या धोरणामुळे तोटा सहन करीत असताना आणि अमेरिकेसह संपूर्ण जगाच्या आर्थिक वाढीचा वेग मंदावलेला असताना मार्च महिन्यात व्यापारी तूट कमी होणे व भारताची अर्थव्यवस्था गतिशील आणि बळकट होणे हा शुभसंकेतच आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेला गती आणि बळकटी देण्यासाठी तसेच लोकांच्या इच्छा-आकांक्षांना मूर्त रूप देण्यासाठी केंद्रातील मोदी सरकारने गेल्या १० वर्षांपासून प्रामाणिक प्रयत्न केले, हे नाकारण्यात अर्थ नाही. अर्थकारण आणि राजकारण या दोन्हींमध्ये मोदी सरकारने उत्तम समन्वय राखला आहे. एकीकडे स्वयंरोजगाराला व ग्रामोद्योगांना चालना देत असतानाच दुसरीकडे औद्योगिक उत्पादनात सातत्याने कशी वाढ होईल, याकडेदेखील मोदी सरकारने लक्ष दिले आहे. त्यामुळे पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट समोर ठेवून वाटचाल करणारा भारत हा सातत्याने औद्योगिक उत्पादन वाढीसाठी तसेच निर्यातवृद्धीसाठीदेखील प्रयत्न करीत आहे. केंद्रातील मोदी सरकारच्या स्टार्टअप इंडिया, कौशल्य विकास योजना, आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया, व्होकल फॉर लोकल, एक जिल्हा, एक उत्पादन (ओडीओपी) योजना या साऱ्याच महत्त्वाकांक्षी योजनांमुळे देशाचे अर्थचक्र अधिकच गतिमान झाले, ही वस्तुस्थिती आहे. 'मिशन शक्ती' अंतर्गत आगामी काळात आमच्या माता, भगिनी व मुलींना दर्जेदार शिक्षण व रोजगाराच्या अधिकाधिक संधी कशा उपलब्ध होतील, यादृष्टीने आम्ही सातत्याने कार्यरत राहू, असे अभिवचन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले आहे. मोदी सरकार पुन्हा तिसऱ्यांदा सत्तेवर आल्यास या वचनाची पूर्तता करेल याची महिलाशक्तीला पूर्ण खात्री आहे. 'हा विकसित भारताचा संकल्प आहे. आता देश छोटी स्वप्ने पाहणार नाही व लहानसहान संकल्पही करणार नाही तर आमची स्वप्नेही मोठी असतील आणि संकल्पही प्रचंड असतील. भारताचा विकास करायचा आहे, हे आमचे स्वप्न आणि संकल्पही आहे,' असे मोदी सध्या देशभरातील प्रचारसभांमध्ये तरुणाईला सांगत आहेत. ही 'मोदी की गॅरंटी' भारतीयांच्या सुरक्षित आणि दर्जेदार जीवनासाठी नक्कीच महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे 'मोदी की गॅरंटी' म्हणजे प्रतिकूलतेवर मात करण्याची इच्छाशक्ती ठेवणे व धैर्य, आत्मविश्वास जागविणे होय, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. त्यामुळे आज वास्तववादी विचार करून देशाला आर्थिक आघाडीवर पुढे नेणाऱ्या व देशवासीयांना कृतिशील, पुरुषार्थी बनवणाऱ्या देशभक्त राज्यकर्त्यांची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रेखाटलेल्या 'विकसित भारत संकल्पचित्रा'त देशातील तरुण, बुद्धिमान, क्रियाशील व उत्साही उद्योजकांनी आपले योगदान दिले पाहिजे. वस्तुस्थिती ही आहे की, पहिल्यांदा म्हणजेच मे २०१४ मध्ये देशाची सत्तासूत्रे हाती घेतल्यानंतर लगेचच केंद्रातील मोदी सरकारने देशाच्या पुनर्बांधणीचे कार्य हाती घेतले होते आणि २०२४ पर्यंत हे सुरूच होते. देशाची पुनर्बांधणी म्हणजे सर्वच स्तरावर अर्थात आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक व अन्य सर्वच क्षेत्रांत व्यापक व गुणात्मक परिवर्तन होय. हे कार्य मुळीच सोपे नाही. यासाठी प्रखर इच्छाशक्ती, सातत्य, प्रयत्न, अविरत कष्ट आणि दूरदृष्टी लागते. या सर्व गोष्टी मोदी सरकारमध्ये आहेत. त्यामुळेच गेल्या ९-१० वर्षांत सर्वच आघाड्यांवर व्यापक व सकारात्मक परिवर्तन झाले असून त्याचे चांगले परिणामही दिसून येत आहेत. जेफरीज आणि डेलॉईट या संस्थांनी वर्तविलेले अंदाज त्याचेच द्योतक आहे. जगातील सर्व आधुनिक पायाभूत सुविधा साध्य करण्यासाठी पंतप्रधानांनी 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास,' असा नारा दिला. २०२४ पासून भारताचा विकसित देश बनण्याच्या दिशेने प्रवास सुरू झाला असून विकासाच्या दृष्टीने पुढचे दशक हे भारताचेच राहणार आहे, अशी ग्वाही आमच्या पंतप्रधानांनी यापूर्वीच दिली आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विकसित भारताचा संकल्प साध्य होण्यासाठी देशातील तरुण उद्योजक, स्टार्टअप्स यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. कारण 'विकसित भारत' ही केवळ आकर्षक अथवा लक्षवेधी घोषणा नसून तो आपल्या सर्वांचा उद्देश आहे. हे आपणच म्हणजेच देशवासीयांनी स्वत:ला दिलेले एक लक्ष्य आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसित भारत संकल्पनेला पुढे नेण्यासाठी देशातील प्रत्येक घटकाचे त्यामध्ये योगदान आवश्यक आहे. २०१४ पूर्वीच्या भारतात म्हणजेच काँग्रेसप्रणीत संपुआ सरकारच्या राजवटीत प्रचंड भ्रष्टाचार, राष्ट्रवादी वृत्तीचा अभाव, तुष्टीकरणाचे घातक राजकारण, घराणेशाही व राजकीय इच्छाशक्तीचा अभाव यांच्यामुळे देशाच्या विकासात अनेक अडथळे आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगमनानंतर देशातील व्यवस्थेमध्ये चैतन्य निर्माण झाले असून गेल्या १० वर्षांत भारताने नाजूक पाच अर्थव्यवस्था ते सर्वोच्च पाच अर्थव्यवस्था असा प्रवास केला आहे. पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने भारत करीत असलेल्या उल्लेखनीय वाटचालीमुळे देशातील तरुणांसाठी अनेक जागतिक संधी उपलब्ध होत आहेत. 'विकास भी विरासत भी' या संकल्पनेनुसार आपली ओळख आणि अभिमान जपून विकास साधला जात आहे. आधुनिक भारताच्या इतिहासात प्रथमच भारत हा अतिशय महत्त्वाच्या अशा टप्प्यावर उभा आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भारतीय नागरिकांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे किंवा आत्मनिर्भरता वाढवण्यावर भर देणे, हे मोदींच्या शासकीय धोरणाचे वैशिष्ट्य आहे. राज्यावर अर्थात सरकारवर अवलंबित्वाची संस्कृती कायम ठेवण्याऐवजी, मोदी सरकारने व्यक्तींमधील आणि समुदायांमधील सुप्त क्षमता बाहेर काढण्याचा प्रयत्न केला आहे. कल्याणकारी कार्यक्रमांच्या माध्यमातून सहाय्य प्रदान करून, कुटुंबांना सरकारी मदतीवर दीर्घकाळ अवलंबून राहण्याच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी सशक्त केले गेले आहे. यामुळे नागरिकांमध्ये स्वयंपूर्णता आणि सन्मानाची भावना वाढली आहे. विकसित राष्ट्र बनत असताना पुढील दशकात आपली वाटचाल कशी असेल, यावर आपले भवितव्य अवलंबून आहे. देशाला पुन्हा गतवैभव प्राप्त करून द्यायचे असेल तर पंतप्रधानांनी काही महिन्यांपूर्वी 'पंचप्राणांचा' उल्लेख केला होता. विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी वसाहतवादी, गुलामगिरीची मानसिकता झुगारून देणे, आपल्या मुळांचा, एकतेचा अभिमान बाळगणे, नागरिकांमध्ये कर्तव्याची भावना निर्माण करणे, नवीन शक्यता, संभावना जोपासणे व नवे संकल्प लक्षात घेऊन आत्मविश्वासाने पुढे जाणे हे ते पंचप्राण होत. देशाला अधिक गतीने पुढे नेण्यासाठी सामूहिक प्रयत्न आणि सांघिक प्रयत्नांना पर्याय नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# महत्त्वाची तिसरी फेरी!



निवडणूक आयोगाने पहिल्या दोन फेऱ्यातील मतदानाची सुधारित टक्केवारी जाहीर केली. पहिल्या फेरीत ६६.१४ तर दुसऱ्या फेरीत ६६.७१ टक्के मतदान झाल्याचे आयोगाने म्हटले आहे. नवी आकडेवारी पाहता २०१९ च्या तुलनेत मतदानात फार घट झालेली नाही. या मतदानाचे दोन अर्थ लावले जाऊ शकतात. एक म्हणजे मतदारांनी कुणाच्या बाजूने मतदान केलेले नाही आणि दुसरा अर्थ म्हणजे मतदार सरकारच्या विरोधात नाही. १९७७ मध्ये आणिबाणीच्या विरोधात लाट होती. त्याचा परिणाम म्हणजे ६१ टक्के मतदान झाले होते. १९८४ मध्ये इंदिरा गांधींच्या हत्येमुळे काँग्रेससाठी सहानुभूतीची लाट होती. त्याचा परिणाम म्हणजे ६४ टक्के मतदान झाले होते. यावेळी सकारात्मक वा नकारात्मक लाट असती तर मतदान जास्त झाले असते. ते झाले नाही याचा अर्थ सत्ताधारी पक्षाला फार चिंता करण्याचे कारण नाही.

**पहिल्या दोन फेऱ्या** : पहिल्या दोन फेऱ्यात केरळ व तामिळनाडू ही दोन राज्ये होती. या दोन्ही राज्यात सत्ताधारी भाजपाला २०१९ मध्ये फारसे यश मिळालेले नाही. या दोन राज्यांत लोकसभेच्या ६० जागा आहेत. म्हणजे पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये जे मतदान झाले आहे, त्याच्या एक तृतीयांश जागा या दोन राज्यांत आहेत. या राज्यांमध्ये यावेळी भाजपाला काही जागा मिळण्याची शक्यता असली, तरी तो पक्षासाठी बोनस मानला जाईल. कारण ही राज्ये कधीही भाजपासाठी चांगली राज्ये मानली जात नव्हती.

**ध्रुवीकरणाचे राजकारण** : केरळ व तामिळनाडूतील राजकारण ध्रुवीकरणाचे राजकारण राहात आले आहे. केरळमध्ये डावी आघाडी व काँग्रेस आघाडी तर तामिळनाडूत द्रमुक व अण्णा द्रमुक असे राजकारण चालत आले आहे. भाजपा यावेळी या राज्यांमध्ये एखादा राजकीय चमत्कार घडवील काय, असा एक प्रश्न विचारला जात आहे. भाजपा यासाठी आशावादी असला, तरी या प्रश्नाचे नेमके उत्तर मिळण्यासाठी ४ जूनची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

**तिसरी फेरी** : तिसऱ्या फेरीत ९४ जागांवर मतदान होत असून ही फेरी पूर्ण झाल्यावर लोकसभेची निम्मी निवडणूक आटोपलेली असेल. तिसऱ्या फेरीत मतदान होत असलेले ९४ मतदारसंघ १२ राज्यांमध्ये पसरलेले आहेत. या फेरीचे भाजपासाठी असणारे महत्त्व म्हणजे गुजरातमधील २६ पैकी २५ मतदारसंघांत या फेरीत मतदान होणार आहे. सुरतची जागा भाजपाने याआधीच अविरोध जिंकली आहे. २०१४, २०१९ या दोन्ही निवडणुकीत राज्यातील सर्व २६ पैकी २६ जागा जिंकल्यानंतर भाजपाला यावेळी विजयाची हॅट्ट्रिक करावयाची आहे. भाजपासाठी तिसरी फेरी महत्त्वाची असल्याचे जे मानले जाते ते यामुळेच!

**मध्यप्रदेश** : मध्यप्रदेशातील भिंड, भोपाळ, गुना, ग्वाल्हेर, मोरेना, रायगढ, सागर, विदिशा या ८ मतदारसंघांत या फेरीत मतदान होत असून २०१९ मध्ये यातील बहुतेक जागा भाजपाने जिंकलेल्या आहेत. काँग्रेस सोडून भाजपात आलेले ज्योतिरादित्य शिंदे यांचे प्रभाव क्षेत्र असलेल्या ग्वाल्हेरमध्ये या फेरीत मतदान होत आहे. माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान विदिशातून निवडणूक लढवित आहेत. त्या सर्व जागा कायम ठेवणे भाजपासाठी महत्त्वाचे ठरणारे आहे.

**कर्नाटक** : दक्षिणेत भाजपाला चांगले यश देणारे राज्य म्हणून कर्नाटकाचा उल्लेख केला जातो. कर्नाटकातील १४ मतदारसंघांत मतदान आटोपले असून उर्वरित १४ मतदारसंघांत उद्या तिसऱ्या फेरीत मतदान होईल. २०१९ मध्ये भाजपाने राज्यातील २८ पैकी २५ जागा जिंकल्या होत्या. काँग्रेस, जनता दल सेक्युलर व अपक्ष यांना प्रत्येकी एक जागा मिळाली होती. वर्षभरापूर्वी राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला मोठा धक्का बसला होता. त्या साऱ्या पृष्ठभूमीवर २०१९ च्या कामगिरीची पुनरावृत्ती करणे भाजपासाठी एक आव्हान ठरणार आहे. राज्यात भाजपाच्या काही जागा कमी होतील, असे मानले जाते. जागांमध्ये होणारी ही घट कमीत कमी राहावी, असा भाजपाचा प्रयत्न राहणार आहे. पण, तरी किती जागा घटतील, याचा अंदाज बांधता आलेला नाही. काँग्रेस नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी २८ पैकी १८ जागा जिंकण्याचा अंदाज वर्तविला आहे. या निवडणुकीसाठी राज्यात तयार झालेले नवे राजकीय समीकरण म्हणजे जनता दल सेक्युलरशी भाजपाने केलेली युती. कर्नाटकाच्या राजकारणात लिंगायत व वोक्कालिंग हे दोन प्रभावी समाज मानले जातात. यात लिंगायत समाज भाजपाकडे तर वोक्कालिंगांचा पाठिंबा देवेगौडांना अशी एक परंपरा स्थापित झालेली आहे. ही युती भाजपासाठी एक जमेची बाजू राहणार आहे. मात्र, तरीही २०१९ च्या कामगिरीची पुनरावृत्ती करणे भाजपासाठी एक आव्हान ठरणार असून, ते आव्हान पक्ष कशाप्रकारे हाताळतो, यावर या राज्यात भाजपाची कामगिरी अवलंबून राहणार आहे.

**महाराष्ट्र** : राज्यातील लोकसभा मतदारसंघांची संख्या विचारात घेता उत्तरप्रदेशानंतर महत्त्वाचे मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील ११ मतदारसंघांत उद्या मतदान होत आहे. यात प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या बारामती मतदारसंघाचा समावेश आहे.

**उत्तरप्रदेश** : उत्तरप्रदेशातील संभल, हाथरस, बरेली, आग्रा, फतेहपूर सिक्री, फिरोजाबाद, मैनपुरी, एटा, बदाऊं, आंवला या १० मतदारसंघांत या तिसऱ्या फेरीत मतदान होत आहे. उत्तरप्रदेशातील प्रत्येक फेरी भाजपासाठी महत्त्वाची ठरणार आहे. २०१४ च्या तुलनेत २०१९ च्या निवडणुकीत भाजपाच्या काही जागा कमी झाल्या आहेत. भाजपाला २०१४ च्या कामगिरीची बरोबरी करावयाची असल्यास प्रत्येक फेरीत एखाद-दुसरी जागा वगळता अन्य सर्व जागा जिंकणे पक्षासाठी आवश्यक ठरणार आहे. राज्यातील सुधारलेली कायदा सुव्यवस्था ही भाजपासाठी एक जमेची बाजू राहणार असल्याचे पक्षाला वाटते.

**सपा-काँग्रेस युती** : राज्यात सपा व काँग्रेस याची युती झाली असली, तरी काही मतदारसंघ वगळता या युतीचा फार काही परिणाम होण्याची चिन्हे नाहीत. सपा नेते अखिलेश यादव यांनी कनौज मतदारसंघातून निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. येथील यादव-मुस्लिम समीकरण विचारात घेता ते निवडून येतीलही. काही मतदारसंघांत या युतीचा प्रभाव दिसेल. मात्र, सपा-काँग्रेस युती राज्यात चमत्कार करील, अशी शक्यता नाही. यात मायावतींची बसपा सामील झाली असती तरी काही मतदारसंघांत भाजपासाठी समस्या निर्माण झाली असती. पण, मायावतींनी स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. बसपाला दलित मते मिळतील. पण, केवळ दलित मतांच्या शिदोरीवर बसपाला निवडणूक जिंकता येणार नाही. २०१९ च्या निवडणुकीत राज्यात बसपा दुसऱ्या क्रमांकावर होती. यावेळी बसपाची स्थिती आणखी घसरण्याची चिन्हे आहेत.

**पहिली निवडणूक** : देशातील काही भागांत मतदानाची टक्केवारी घसरली असली, तरी अन्य काही भागांत ७०-७५ टक्के मतदान होत आहे, ही बाब भारतीय लोकशाहीसाठी अतिशय समाधानकारक आहे. हिंसाचारग्रस्त मणिपूरमध्येही ७० टक्क्यांहून अधिक मतदान झाले आहे. ब्रिटिशांशी लढून देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत फक्त ४४ टक्के मतदान झाले होते, हे विशेष. तर, १९५७ मध्ये झालेल्या दुसऱ्या लोकसभा निवडणुकीत मतदानाचे प्रमाण एक टक्का वाढून ते ४५ टक्के झाले. नंतर हळूहळू मतदानाची टक्केवारी वाढू लागली. लोकशाहीची जननी मानल्या जाणाऱ्या ब्रिटन-अमेरिकेतही ६०-६५ टक्के मतदान होत आले आहे. त्यामुळे भारतात होत असलेले मतदान कमी नाही. पण, योग्य हवामानात मतदान झाले तर मतदानाचे प्रमाण ७० टक्क्यापर्यंत जाऊ शकते. अर्थात हे सारे निवडणूक आयोगाच्या सुबुद्धीवर अवलंबून आहे.

## वेध

पुंडलिक आंबटकर

# कोट्यवधींचा निधी; गावे बकाल तरी!

सध्या संपूर्ण देशात लोकसभा निवडणूक सुरू आहे. या निवडणुकीची ४ जून रोजी मतमोजणी होईल. त्यानंतर ६ महिन्यांनी महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक लागू शकते. लोकसभा आणि विधानसभा निवडणुका देशहित, पक्षीय विचारसरणी आणि विकासाच्या मुद्यांवर लढविल्या जातात. या निवडणुकांमध्ये जात हा घटक कमकुवत असतो. परंतु, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मात्र जातीचा बागुलबोवा हमखास उभा केला जातो आणि तो तितकाच प्रभावीसुद्धा ठरतो. ग्रामपंचायत निवडणुकांना लोकसभा-विधानसभा निवडणुकांची रंगीत तालीम म्हटले जाते. परंतु, ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये स्थानिक मुद्देच अधिक प्रभावी ठरतात. जाती-पातीच्या या राजकारणात अकुशल आणि अक्षम उमेदवार सरपंच म्हणून निवडून येतो आणि मग गावाची कधीही भरून न निघणारी हानी होते. याला सर्वस्वी जबाबदार गावकरीच असतात. कारण, त्यांनीच दुय्यम उमेदवाराला निवडून दिलेले असते.

शासनाने ग्रामपंचायतींना प्रचंड अधिकार दिलेले आहेत. १४ व्या आणि १५ व्या वित्त आयोगाने ग्रामीण भागाच्या विकासासाठी खोऱ्याने पैसा ओतला. ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी केंद्र सरकारसह राज्य सरकारही प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी तब्बल १ हजार १४० योजना कार्यान्वित आहेत. इतक्या योजना असूनही बहुतांश गावे आजही आपला बकालपणा मात्र घालवू शकलेली नाहीत!

ज्या गावातील नागरिक सुज्ञ व जागरूक असतात, त्याच गावाचा विकास झपाट्याने होतो. ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती आणि परिस्थितीशी झगडण्याची तयारी असावी लागते. ज्येष्ठ समाजसेवक देवाजी तोफा यांनी हे सिद्ध करून दाखविले आहे. बहुतांश गावांमध्ये केवळ पांढरे कपडे घालून मिरविणारे लोक सरपंच होऊन बसले आहेत. यात सुशिक्षित म्हणून मिरविणाऱ्या पांढरपेशांचा मोठा भरणा आहे. अशा लोकांमुळे संबंधित गावे आपोआपच विकासाच्या स्पर्धेतून बाहेरी फेकली जातात. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३८ अन्वये सरपंचांना विशेषाधिकार प्राप्त आहेत. परंतु, झाडून सर्वच सरपंचांना आपले अधिकार माहीत असतात का, हा खरा संशोधनाचा विषय आहे. गावाच्या प्रमुखाला आपले अधिकारच ठाऊक नसेल तर विकास होणार तरी कसा?

ग्रामसचिव अर्थात ग्रामसेवक म्हणून शासनाने नियुक्त केलेला सेवेकरी ग्रामपंचायतमध्ये कार्यरत असतो. परंतु, बहुतांश ग्रामसेवकांना शासकीय योजनांची पुरेपूर माहिती नसते! या लोकांना निव्वळ कागदी घोडे नाचविण्याची सवय आहे. ग्रामसेवक गावकऱ्यांचा नोकर असतो. परंतु, तो मालकाच्या तोऱ्यात वावरतो आणि वागतोसुद्धा! ग्रामसभेला कायद्याने विशेषाधिकार दिलेले आहेत. परंतु, बहुतांश गावांमध्ये ग्रामसभाच होत नाही. झाल्याच तर गावकरी हजर राहात नाही. त्यामुळे संबंधितांना भ्रष्टाचार करण्यासाठी मोकळे रान मिळते. अलिकडे ग्रामीण भागातही जागरूकता येत आहे. ही समाधानाची बाब असली तरी आजही ग्रामपंचायत निवडणुका जाती-पातीच्या आधारावर लढविल्या जातात. हे देश विकासाच्या दृष्टीने खूपच घातक आहे. ग्रामपंचायत निवडणुकाही जेव्हा विकासाच्या मुद्यावर लढविल्या जातील तेव्हा ग्रामीण भागात विकासाची क्रांती घडून आल्याशिवाय राहणार नाही.

घटनाकारांनी मागासवर्गीयांना सत्तेत वाटा मिळावा म्हणून राजकीय आरक्षणाची तरतूद केलेली आहे. परंतु, घटना समितीने राजकीय आरक्षण केवळ १० वर्षांसाठी लागू केले होते. नंतर केवळ मागासवर्गीयांची मते लाटण्यासाठी वारंवार या आरक्षणाला मुदतवाढ देण्यात आली. राजकीय आरक्षणामुळे मागासवर्गीयांचा खरोखरच विकास झाला का? एखादी मागासवर्गीय व्यक्ती ग्रामपंचायत सदस्य अथवा सरपंच झालीच तर ती गावाला न्याय मिळवून देऊ शकते का? महिला आरक्षणामुळेही फार काही साध्य होऊ शकलेले नाही. एखादी महिला आरक्षणाच्या जोरावर सरपंच झाली तरी तिचा पती अथवा गावपुढारीच कारभार सांभाळतो. आरक्षित जागांवर हे गावपुढारी मुद्दाम अज्ञानी अथवा कमकुवत व्यक्तीला उमेदवारी देतात. अनेक गावांमध्ये मजूर महिला सरपंच वा ग्रामपंचायत सदस्य होऊन बसल्या आहेत. त्यांना नेमके काय करावे लागते, हेच ठाऊक नसते. अनेक ग्रामपंचायत सदस्य महिला केवळ झेंडावंदनासाठी ग्रामपंचायत कार्यालयात जातात. वर्षभर शेतशिवारातील कामे करण्यातच त्यांचा वेळ जातो. हेतूच साध्य होत नसेल तर या राजकीय आरक्षणाचा फायदा तरी काय? हे कुठेतरी थांबले पाहिजे. ग्रामीण भागातही शैक्षणिक क्रांती घडून आली आहे. ही समाधानाची बाब असली तरी परिस्थिती बदलण्यासाठी आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर

# राजकीय पक्षांकडे कार्यकर्त्यांनी पाठ का फिरविली?

राजकीय पक्ष असो की सामाजिक संघटना या सर्वांकडेच आजकाल कार्यकर्त्यांचा दुष्काळ पडल्याचे चित्र आहे. काही पक्ष, संस्था त्याला अपवाद आहेत. परंतु, त्यांच्याकडे उपलब्ध असलेले कार्यकर्ते इतरांपेक्षा जास्त असले, तरीही पूर्वी त्यांच्याकडे किती होते आणि आता त्यांच्याकडे किती आहेत, याचा त्यांनी विचार करण्याची आवश्यकता आहे. तुमच्या जवळचे मुद्दल संपले असेल आणि तुम्ही फक्त व्याजावर दिवस काढत असाल तर ही नक्कीच चिंतेची आणि चिंतनाची गोष्ट आहे.

फार पूर्वी नेत्यांनी एक आवाज दिल्यानंतर मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते जमा व्हायचे. नेत्यांचे आवाहन तर दूरच राहू द्या; परंतु त्यांच्या चमच्यांच्या आवाहनावरसुद्धा मोठ्या प्रमाणावर लोक जमा व्हायचे. गावातील प्रमुख दोन-चार लोकांना जर पकडले तर संपूर्ण गावाचे मतदान ताब्यामध्ये यायचे; परंतु आता अशी परिस्थिती नाही. आता प्रत्येक जण स्वतंत्र मताचा झालेला आहे किंवा लोकांना जमा करणाऱ्या ठेकेदारांना तो आता मानेनासा झालेला आहे. याला कारणीभूत अनेक गोष्टी आहेत. ज्या वेळेला देश पारतंत्र्यात होता त्यावेळेला समाजाचे नेतृत्व करणारे लोक नि:स्वार्थ होते. अशा त्यागी वृत्तीच्या लोकांकडे पाहून 'तेथे कर माझे जुळती' अशा पद्धतीची भावना कार्यकर्त्यांमध्ये व सर्वसामान्य जनतेमध्ये उमटत होती. परंतु, देश स्वतंत्र झाला, देशामध्ये भ्रष्टाचाराचा शिरकाव झाला. त्यानंतर हळूहळू चित्र बदलत गेले. मोठमोठ्या कामांचे कंत्राट नेत्यांना बायको पोरांच्या नावावर मिळू लागले. त्यांचे उद्योगधंदे स्थापित होऊ लागले. पाहता पाहता ते फारच मोठे झाले. त्यानंतर एक काळ असा आला की, त्यांनी त्यांच्या आजूबाजूच्या दहा-पाच लोकांकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. हे आजूबाजूचे लोक नंतर कार्यकर्त्यांचे ठेकेदार बनले. नेते मंडळीसुद्धा आश्वस्त झाली. त्यांना वाटले की, चला सर्वसामान्य कार्यकर्त्याला जवळ करण्याची आवश्यकता नाही. आपण दहा-पाच चमच्यांना सांभाळले तरी ते उर्वरित लोकांना सांभाळत राहतील. करता करता काही खास कृपापात्र लोकांना पेट्रोल पंप, आश्रम शाळा मिळू लागल्या. पाहता पाहता हे लोक मोठे प्रस्थापित बनून गेले. अनेक कार्यकर्त्यांचे यांच्या मागे फिरता फिरता त्यांच्या उमेदीचे वर्ष समाप्त झाले. काहींची राजकीय महत्त्वाकांक्षा होती तर काहींची तीही नव्हती. ज्यांची राजकीय महत्त्वाकांक्षा होती त्यांना या वेळेला 'तू थांब, पुढल्या वेळेला तुझा नक्की विचार करू,' असे म्हणता म्हणता त्यांची पोरंसुद्धा मोठी होऊन गेली. परंतु यांचा नंबर काही आलाच नाही. असेच दिवस जात गेले आणि मग हे जुने कार्यकर्ते बाजूला पडत गेले. राजकारणाचे गारुड आणि प्रलोभन इतके मोठे होते की, नवनवीन लोकांना त्याचे आकर्षण वाटतच राहिले. विरोधामध्ये बसणारे सत्तेमध्ये आले. सत्तेमधले विरोधामध्ये गेले. परंतु कार्यकर्ते जिथल्या तिथेच राहिले. शिरगणती पूर्ण करण्यासाठी का होईना जुन्या कार्यकर्त्यांच्या जागेवर निवडणुकीपुरते तरी नवीन लोक येत राहिले. जुने मात्र कायमचे दुरावले. ते फक्त मतदार बनले. काही पक्षांमध्ये विचारधारा नावाची गोष्ट होती. त्यांच्याकडे काही कार्यकर्ते विचारधारा म्हणून लाजेस्तव कायम राहिले. त्यांनी मार्ग बदलला नाही. पक्ष बदलला नाही. तरीसुद्धा 'पळसाला पाने तीनच' हाच अनुभव त्यांना आला. अजून दिवस पुढे जात गेले. मग मात्र कार्यकर्त्यांच्या हे लक्षात आले की, पाच वर्षे काम करून काही उपयोग नाही. सत्ता असली काय आणि नसली काय आपला उपयोग गर्दी जमवण्यासाठी आहे, हे जेव्हा त्यांच्या लक्षात आले त्यावेळेस जेव्हा निवडणुका येतील तेव्हा पाहू. आपण आपल्या कामधंद्याला लागलेले बरे. असा विचार अनेकांनी केला. त्यामुळे हंगामी स्वरूपाचे कार्यकर्ते तयार होऊ लागले. असे कार्यकर्ते जेव्हा निवडणुका यायच्या त्याच वेळेला कामात यायचे. नंतर पुन्हा पाच वर्षे ते झोपी जायचे. कुठलेही धरणे-आंदोलन म्हटले की, कार्यकर्त्यांपेक्षा पदाधिकारी तिथे मोठ्या प्रमाणावर उपस्थित असतात. असे चित्र सर्वच राजकीय पक्षांमध्ये पाहायला मिळते. बाहेरच्या पक्षामधून आलेल्या आयारामांना प्रतिष्ठा प्राप्त झाली व पक्षनिष्ठांची अवहेलना झाली.

या राजकीय कार्यकर्त्यांनी आपल्या पोरासोरांना सांगितले की, बाबांनो आमची अनेक वर्षे येथे वाया गेली आहेत. तुम्ही ही चूक करू नका. तुम्ही शांतपणे आपल्या कामधंद्याचे बघा. त्यामुळे तरुण वर्ग विचारधारा तीच असली, तरी पुन्हा त्यांच्या वाटेला गेला नाही. राजकीय नेत्यांची जादू समाप्त होत गेली. लोकांमधले त्यांचे आकर्षण समाप्त होत गेले. त्यांच्या चकचकीत गाड्या, मोठमोठ्या इमारती, उभे झालेले उद्योग याच्यामुळे कार्यकर्त्यांना त्यांच्याबद्दल असूयाच जास्त वाटत राहिली.

राजकीय पक्ष हजारो कार्यकर्त्यांचे पुनर्वसन करू शकत नाही, त्यांना नोकरी देऊ शकत नाही. परंतु सरकारी नाही तर खाजगी नोकरीसाठी प्रयास केले जाऊ शकतात. एखादे मोठे कंत्राट देताना 'तुझ्याकडे लागणारे मनुष्यबळ तू आमच्या पक्षाच्या लोकांमधून घे,' असे त्याला ठासून सांगितले जाऊ शकते. वेगवेगळ्या गोष्टीच्या एजन्सी आणि सरकारी गोष्टी वाटप करताना यातील काही कार्यकर्त्यांचा विचार केला जाऊ शकतो. ज्यांना तुम्ही नोकरी-व्यवसाय-उद्योग काहीच देऊ शकले नाही; कमीत कमी त्यांना वेगवेगळ्या निमित्ताने सन्मान तरी तुम्ही देऊ शकता. पक्षांमध्ये संपत चाललेली विचारधारा, नि:स्वार्थ नेतृत्वाचा अभाव, कार्यकर्त्यांची संपत चाललेली कदर, पक्षांमध्ये वाढत चाललेली वापरा आणि फेकून द्या, ही मानसिकता, यामुळे बऱ्याच वेळा कार्यकर्त्यांमध्ये 'मला काय त्याचे?' अशा पद्धतीची प्रवृत्ती निर्माण होते आणि ते पाठ फिरवितात. ज्यांना पुढल्या २०-२५ वर्षांची राजकीय योजना करायची आहे, अशा राजकीय पक्षांनी याचा विचार करणे आवश्यक आहे. कुठलाही पक्ष हा जनतेमध्ये पकड असलेल्या कार्यकर्त्यांशिवाय यशस्वी होऊ शकणार नाही. त्या पक्षाचे विचार, त्याचे कार्य हे सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचणार नाही. असे जर झाले तर केवळ वर्तमानपत्र, दूरदर्शन वाहिन्या यांच्यावर जाहिराती देऊन काम भागणार नाही. याचा फटका राजकीय पक्षांना पडेल. त्यामुळे घरोघरी प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचणारा कार्यकर्ता हाच पक्षाच्या विचारधारेचा वाहक आहे आणि त्याला टिकवून ठेवणे हे कोणत्याही काळामध्ये राजकीय पक्षांसाठी आवश्यक आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### रायबरेलीतून राहुल गांधी

काही महिन्यांपूर्वी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी राज्यसभेवर निवडून आल्या तेव्हाच स्पष्ट झाले होते की, यावेळेस त्या रायबरेली येथून लोकसभा निवडणूक लढविणार नाहीत. हा मतदारसंघ त्यांनी प्रियांका वढेरा यांच्यासाठी निश्चित केला असावा, असा समज होता. काँग्रेसमध्ये फक्त गांधी परिवाराची चालते, असा आरोप होत असतो. त्याला अजून गती मिळू नये म्हणून काँग्रेसने प्रियांका वढेरांचे नाव बाजूला ठेवले असावे. राहुल गांधी यांनीच वायनाड (केरळ) या मतदारसंघातून उमेदवारीसाठी अर्ज भरल्यावर ३ मे रोजी रायबरेली येथूनही अर्ज भरला. २०२२ ला उत्तरप्रदेश येथे विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचा प्रचंड पराभव झाला होता. जेमतेम दोनच मतदारसंघांत काँग्रेसला विजय मिळाला. तिथेच लक्षात आले की, उत्तरप्रदेशसारखा अत्यंत महत्त्वाच्या राज्यात काँग्रेस पक्ष संपल्यात जमा आहे. अमेठीहून उभे राहिल्यास राहुल गांधी यांचा पराभव पुन्हा एकदा निश्चित आहे, म्हणून तेथून उभे राहणे त्यांनी टाळले. वायनाड येथे विजय निश्चित आहे. कारण मागच्या वेळेस कधी नव्हे ते अंदाजे आठ लाख मताधिक्याने ते विजयी झाले होते. रायबरेली हा काँग्रेसचा नसून नेहरू-गांधी परिवाराचा बालेकिल्ला आहे. पूर्वी इंदिरा गांधी त्यानंतर मागील दोन वेळी सोनिया गांधी बड्या मताधिक्यांनी विजयी झाल्या असल्या, तरी मताधिक्यात घट झालेली आहे. काँग्रेसने राहुल गांधी यांना येथील उमेदवारी देऊन रायबरेलीशी त्यांचा घनिष्ठ संबंध व अतूट नातं आहे, असं दाखविले आहे. दोन मतदार संघांतून उभ्या असलेल्या उमेदवारासमोर एक प्रश्न येतोच; आता दोन्ही जागांवरून निवडून आले तर कोणती तरी एक जागा सोडावी लागते. राहुलच्या बाबतीत तसे झाले तर ते कोणती जागा सोडणार; वायनाड की रायबरेली! याचा निर्णय रायबरेली मतदारांना घ्यायचा आहे.

**अमोल पाठक**/९५४५८९८४४६

### अक्षय्य तृतीयेचे पौराणिक महत्त्व

भगवान श्रीकृष्णाने पांडवांचा मोठा भाऊ सम्राट युधिष्ठिर याला अक्षय्य तृतीया या तिथीचे महत्त्व सांगताना असे सांगितले की, हे युधिष्ठिरा, या तिथीला केलेले दान आणि हवन कधीच



क्षयाला जात नाही, म्हणून ऋषी-मुनींनी या तिथीला 'अक्षय्य तृतीया' असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे या दिवशी देव आणि पितर यांच्यासाठी जे काही कर्म केले जाते ते सर्व अक्षय होते. म्हणजेच कधीच नाश पावत नाही. अक्षय्य तृतीयेचा उल्लेख महाभारतातदेखील आढळतो. अक्षय्य तृतीया या दिवशीच कृष्ण आणि सुदामा यांची भेट झाली होती. द्रौपदी वस्त्रहरणाच्या प्रसंगी श्रीकृष्णाने द्रौपदीला अक्षय वस्त्र पुरवले; तो दिवसदेखील अक्षय्य तृतीयेचा होता. यावरून अक्षय्य तृतीयेचे पौराणिक महत्त्व लक्षात येते.

**संगीता भोसले**/९७६७५६०२३६

### अन्नाची नासाडी

'अन्न हे परब्रह्म' म्हटले जाते, पण, त्याच अन्नाची कदर न करता नासाडी केली जात असेल तर मात्र 'अन्न हे परब्रह्म' म्हणण्यात काय अर्थ? गेल्या काही वर्षांत लग्न समारंभादी कार्यक्रमात जेवणाची पंगत बसवली जात होती; सोबतच पळसाच्या पानांची पत्रावळ असायची. त्यामुळे पंगतीत जेवण करण्याचा आनंद व समाधान हा विशेषतः जगावेगळा होता. आजकाल पळसाच्या पानांची पत्रावळ लुप्त होण्याच्या मार्गांवर तर दिसत आहेच; सोबतच पंगतसुद्धा दिसणे हळूहळू कमी होत आहे. प्लॅस्टिकचे ताट, वाट्या, पेले हेच साधन झाले आहेत म्हणून आजाराचे प्रमाण वाढत आहे. गावखेड्यात आजही जेवणाची पंगत बसवली जाते त्यामुळे तेथे अन्न वाया जात नाही. गावखेड्यात गोर, गरीब, कामगार, शेतकरी लोक राहत असतात. त्यांना अन्नाची कदर असते. पण, शहरात मात्र बुफेच्या चालीमुळे जिकडे-तिकडे अन्न पडलेले दिसून येते तरीही त्यांना अन्नाविषयी काहीही वाटत नाही की अन्न पिकविणाऱ्या बळीराजाविषयी आस्था वाटत नाही. लाखोंची उधळण करून बुफेमध्ये अन्नाची नासाडी करतात. भारत देश हा कृषिप्रधान असून त्याच देशात अन्नाची नासाडी अशा प्रकारे केली जात असेल तर जग भारत देशाकडून काय बोध घेणार आणि येणारी पिढी काय शिकणार? ही आजची सत्य परिस्थिती आहे. या देशात बहुतांश लोक भुकेने व्याकूळ होऊन अन्नासाठी वणवण भटकत फिरत आहेत तर काही लोक भीक मागून पोट भरण्यासाठी संघर्ष करीत आहेत, तरी एक वेळचे त्यांचे पोट भरत नाही आणि आज याच बुफेच्या चालीमुळे अन्नाची नासाडी मोठ्या प्रमाणात होत आहे. अन्न कमवणारा बळीराजा उपाशीपोटी दिवसभर काम करत असतो आणि जगाला पोसत असतो; पण त्याच कष्टकरी बळीराजाच्या अन्नाची ही दुर्दशा होत असेल तर मात्र बळीराजाची कोणी कदर करावी? ही बुफेची प्रथा गावखेड्यातून नव्हे तर शहरातून आलेली आहे. हळूहळू तिला आता गावाकडे आणले जात आहे. त्यामुळे हा चिंतेचा विषय आहे. पोट भरण्यासाठी अन्नाचीच गरज असते म्हणून त्या अन्नाची नासाडी होण्यापासून वाचवावे.

**संगीता संतोष ठलाल**/७८२१८१६४८५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८४७२६८
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No 46878/87

# ना.रावसाहेब दानवे यांच्या विजयासाठी महिला आघाडीचा डोअर टू डोअर प्रचार

**तभा वृत्तसेवा**
**जालना /सुरेश कवडे पाटील**

जालना लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार, केंद्रीय मंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे यांच्या विजयासाठी जालना शहरात भाजपा महिला आघाडीने चांगलीच कंबर कसली असून नियोजनबद्धपणे प्रभाग निहाय कॉर्नर बैठका ,घरोघरी जाऊन संवाद साधला जात आहे.

सौ. सुशिलाताई दानवे, सौ. उषाताई आकात, सौ .संध्याताई देठे ,जालना महानगर शहराध्यक्षा सौ. शुभांगीताई देशपांडे ,सौ .अरुणा जाधव , सौ.विमलताई आगलावे, माजी नगरसेविका सकुबाई पनबिसरे, पार्वती बाई लहाने, सांस्कृतिक सेलच्या जिल्हाध्यक्षा सौ.दीपा बिन्नीवाले, सौ.



विद्या कुलकर्णी, सौ.संध्या पडूळ,वर्षा ठाकूर ,ममता कोंड्याल, वंदना ढगे, वैशाली बनसोड ,मनीषा भोसले, यांच्यासह पदाधिकारी व महिलांनी मागील दहा दिवसांपासून संपूर्ण शहर पिंजून काढणे सुरू केले असून दररोज सकाळ आणि संध्याकाळी बैठकांचा धडाका सुरू आहे.

कचेरी रोड ,भाग्यनगर, आनंदी स्वामी गल्ली, शास्त्री मोहल्ला, मम्मादेवी नगर, आनंदवाडी, सहकार बँक कॉलनी ,जमुना नगर ,विद्युत कॉलनी, मोदीखाना, गोपाळपुरा, कॉलेज रोड ,पोलास गल्ली, सराफा, क्रांती नगर,शाकुंतल नगर ,प्रशांतीनगर ,भालेनगरी, तुळजाभवानी नगर, नरिमन नगर, नीलम नगर, सोनल नगर ,कोळेश्वर गल्ली, कांचन नगर ,इंदिरानगर ,कांचन नगर, शिवनगर ,प्रयाग नगर, राणा नगर, सिरसवाडी, आदी विविध ठिकाणी जाऊन कॉर्नर बैठका तसेच घरोघरी महिलांशी संवाद साधत केंद्रीय मंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे यांनी आपल्या दूरदृष्टी आणि कल्पक नेतृत्व मुळे जालना शहरात निर्माण केलेल्या पायाभूत सुविधा, केंद्राकडून महत्त्वकांक्षी प्रकल्प, योजना खेचून आणत रेल्वे, पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते, पथदिवे, ओपन जिम, अशा विकास कामांचा लेखा-जोखा मांडत येणाऱ्या निवडणुकीत कमळ या निशाणी समोर मतदान करून ना. रावसाहेब दानवे यांना विजयी करावे असे आवाहन केले जात असून प्रत्येक प्रभागात महिलांना सकारात्मक प्रतिसाद मिळतोय. विकास कामांमुळे मतदारांमध्येच उत्साहाचे वातावरण असून यंदा ना.रावसाहेब दानवे यांना जालना शहरातून मोठे मताधिक्य मिळेल. असा ठाम विश्वास महिला पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. प्रचार दौऱ्यात जान्हवी वैद्य, सुनंदा बदनापूरकर ,रोहिणी टाकळकर, सुलभा कुलकर्णी ,विद्याताई देशमुख ,मीना गायकवाड , गीता राजगुडे , निलावती धावणे, विशाखा नाईक, अश्विनी देशपांडे ,अरुणा फुलमाडीकर, शरयू चिखलीकर, अपर्णा देशपांडे ,रेणु घन, अमृता पाटील, पल्लवी टाकळकर आदींचा सहभाग आहे.



# शैलबाला अंजना मार्टीन यांनी केली कक्षांची पाहणी

## नोडल अधिकाऱ्यांनी व्यवस्थितपणे आपल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात

**तभा वृत्तसेवा**
**जालना/ प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने १८-जालना लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निरीक्षक (जनरल) शैलबाला अंजना मार्टीन यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणुकीच्या कामाकरीता गठीत विविध कक्षांना भेटी देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली.

यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, तहसिलदार योगिता खटावकर आदी उपस्थित होते.

श्रीमती मार्टीन यांनी मिडिया कक्ष, उमेदवार यांचे खर्चविषयक व्यवस्थापन कक्ष, विविध परवाने व चौकशी कक्ष (एक खिडकी), सी-व्हीजील ॲप कक्ष, संगणक सायबर सिक्युरिटी कक्षाला भेट दिली व संबंधित अधिकाऱ्याकंडून कामाकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

निवडणुकीच्या कामात प्रत्येक नोडल अधिकाऱ्याने आपल्या जबाबदाऱ्या व्यवस्थितपणे पार पाडाव्यात. कोणतीही तक्रार येणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. निवडणुकीतील खर्चविषयक बाबींकडे बारकाईने लक्ष द्यावे. माध्यम कक्षाने उमेदवारांच्या निवडणूक जाहिराती व पेडन्यूजवर लक्ष ठेवावे. सी-व्हीजील पवर प्राप्त तक्रारींचे तात्काळ निराकरण करावे. परवाने कक्षाने सर्व कागदपत्रे तपासून वेळेवर परवाने द्यावेत, अशा सूचना श्रीमती मार्टीन यांनी संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी केल्या.

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी विविध नोडल अधिकारी यांच्याकडून करण्यात येत असलेल्या कामांची माहिती दिली.

यावेळी विविध कक्षासाठी नियुक्त केलेले नोडल अधिकारी जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी राजू सोळंके, जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, एनआयसीचे जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी श्री. आर.पी. पडूळकर आदी उपस्थित होते.

# संक्षिप्त

## ८५ प्लस वयोवृद्ध व दिव्यांग मतदारांनी केले घरून पोस्टल मतदान



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन / प्रतिनिधी**

भोकरदन येथे जालना लोकसभा मतदारसंघात निवडणूक आयोगाने ठरविल्या प्रमाणे भाग नंबर १८६ मधील दीव्याग आशितोष अनिल जाधव आणि वैष्णवी अनिल जाधव या दोन सख्ख्या बहिण भावांनी पहील्यांदाच रोजी सकाळी नऊ वाजता पोस्टल मतदान करुन आपला मतदानाचा हक्क बजावला.

भोकरदन जाफराबाद विधानसभा मतदारसंघात दीव्याग मतदार २६ असुन ८५ प्लस वयोवृद्ध हे २५५ असे एकूण ३५१ मतदान असुन आज ता.६/५/२०२४ व ७/५/२०२४ असे दोन दिवस प्रत्येक मतराच्या घरी मतदान केंद्राध्यक्ष व सर्व टीम जाऊन पोस्टल मतदान करुन घेणार आहे.त्या प्रमाणे आज भाग नंबर १८६ मध्ये सकाळी ८ वाजता मतदान केंद्राध्यक्ष बी.ए.दळवी, सहाय्यक महेंद्र साबळे, निरीक्षक प्रशांत कांबळे, बीएलओ जी.व्ही.शर्मा, सहाय्यक रामेश्वर शर्मा, पोलिस कर्मचारी एल.व्ही.चौधरी, व्हिडिओ ग्राफर भगवान जांभळे यांनी देशमुख गल्ली मधील आशितोष अनिल जाधव आणि वैष्णवी अनिल जाधव यांचे घरी जाऊन पोस्टल मतदान करुन घेतले.

त्या बद्दल या मतदारांनी निवडणूक आयोगाच्या नियोजनबद्ध कार्यक्रमा मुळे आज आम्ही दोघांनांही आमचा अधिकार आम्हाला प्राप्त करून दीला. त्या बद्दल त्यांनी निवडणूक आयोगाचे आभार मानले.

## डोणगाव येथे चैती उत्सव साजरा



### आईच्या सोंगची गावातुन भव्य मिरवणूक काढण्यात आली, यावेळी नागरिकांनी पूजा करून केला आनंद उत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी / प्रतिनिधी**

जाफ्रबाद तालुक्यातील डोणगांव येथे चैतिच्या यात्रेच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक मनोरंजनक अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गावकऱ्यांच्या वतीने चैतींच्या उत्सवात दि.५ मे रोजी पारंपरिक आईचे सोंग, पूजन करून रात्री आईच्या सोंगास सुरुवात करण्यात आली. यावेळी डोणगांव पंचक्रोशीतील गावातील नागरिकांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला. यावेळी विद्यार्थी, महिला, नागरिकांनी पूजा पाठ करून स्वागत केले .

शेकडो वर्षा पासून चालत आलेली या गावाची यात्रेची ग्रामीण भागात उन्हाळ्याच्या वेळी शाळेला सुट्ट्या असतात यात्रा निमित्त एकमेकांची भेटीगाठी आनंद उत्साह दिसून येत आहे. ग्रामीण भागातील छोटे मोठे दुकानदार , विविध कार्यक्रम व साहित्य खेळ बघण्यास नागरिकांची गर्दी दिसत होती. आईचे सोंग काढण्यात आले त्यामध्ये गावातील चार ते पाच व्यक्तीने आईच्या सोंगांचा रूप धारण करून सगळ्यांचा उत्साह वाढविला . दर्शनाकरिता लहान मुलांपासून वयोवृद्ध पुरुष महीला मोठ्या संख्येने उपस्थित होते. आईचे सोंग आईचे रूप धारण करून सुभाषराव रजाळे , रामचंद्र हिवाळे, विष्णू अंभोरे, गणेश हिवाळे , यांनी रूप धारण केले होते

## भोकरदन पोलिसांची धडक कारवाई

# सिनेस्टाईल पाठलाग करून सात लाख रुपये किंमतीचा अवैध गुटखा पकडला

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन / प्रतिनिधी**

भोकरदन पोलिसांना एका खबऱ्या मार्फत पांढऱ्या रंगाच्या फॉर्च्यूनर चार चाकी वाहनामध्ये अवैधरीत्या गुटखा वाहतूक करीत असल्याचे गुप्त माहिती दिली असता या माहितीच्या आधारे रात्री आठ वाजेच्या सुमारास पोलीस उपनिरीक्षक पवन राजपूत त्यांच्या पथकातील संदीप भुतेकर हे सांगितलेल्या ठिकाणी सदर वाहनाचा शोध घेत असता सदर वाहन छत्रपती शिवाजी महाराज चौका जवळून राजूरच्या दिशेने जाताना दिसली असता हसनाबाद पोलीस स्टेशनची मदत घेत सिनेस्टाइल पाठलाग करून त्या गाडीला थांबवले थांबवून त्या गाडीतील चालकास पकडण्यास पोलिस वाला यश आले, मात्र एक इसम या गाडीतून उतरून रस्त्याच्या जवळ असलेल्या शेतीच्या रस्त्याकडे पळाले असता त्यांचा पाठलाग करून चालक नामे ऋषिकेश फरताडे यास ताब्यात घेतले असून त्याच्यासोबत असलेला दुसरा इसम अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला त्यानंतर पंचा समक्ष सदर वाहनाची झाडाझडती घेतली असता




राजनिवास, आर एम डी, विमल आशा प्रतिबंधित गुटखा त्यामध्ये आढळून आला, असून फॉर्च्यूनर सह सहा लाख ८८ हजाराचा गुटखा भोकरदन पोलिसांनी ताब्यात घेतला असून सदरची कारवाई भोकरदन पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पवन राजपूत, संदीप भुतेकर, हसणाबाद पोलीस ठाण्याचे सापोनि अहिरे, पोलीस उपनिरीक्षक फडे, निलेश खरात ,समाधान जगताप व पोलीस मित्र भागवत मोरे यांनी केली

# शिष्यवृत्ती परीक्षेत नॅशनल उर्दू शाळेच्या विद्यार्थ्यांचे मोठे यश

## शिष्यवृत्ती परिक्षेत १५ पैकी १३ विद्यार्थी पात्र; विद्यार्थी व पालकांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन / प्रतिनिधी**

१८ फेब्रुवारी २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक परिषद, पुणे आयोजित इयत्ता पाचवीच्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यात नॅशनल उर्दू प्राथमिक शाळेतील १५ पैकी १३ विद्यार्थी पात्र ठरले या यशाबद्दल नॅशनल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष व कॅबिनेट मंत्री अब्दुल सत्तार, सचिव व उपनगर अध्यक्ष अब्दुल समीर, कुर्ष अध्यक्ष अब्दुल आमेर आणि प्रशासकीय अधिकारी रईस खान यांनी या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

शेख रखशान इरफान, अमान उमर खान,नुमान इम्रान खान, अलिशा वसीम अन्सारी, शेख राबिया उस्मान, सय्यद जिक्रा मुख्तारुद्दीन, शेख माहिरा सलीम, पठाण आयशा मजहर, पठाण उम्मे कुलसूम अतीक खान, फैजा नाजीश शेख एजाज, फातेमा अख्तर बेग, शाह ओवेस मतीन, शेख महेक कय्युम या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सोमवारी (दि.०६)शाळेच्या वतीने सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सर्व यशस्वी विद्यार्थी व पालकांचा केंद्रीय मुख्याध्यापक तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष शेषराव गवळी यांच्या हस्ते हार घालून सत्कार करण्यात आला या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून रईस सिद्दीकी , रफिक शाह उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करणाऱ्यांसाठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक शेख इरफान, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक शेख जाफर, लिपिक शेख नईम, शिक्षक सय्यद युसूफ, शेख जाफर, अनीस खान, शेख वाजिद, शेख इद्रिस, अबरार देशमुख, मुख्तार कुरेशी, पठाण अन्सार, शेख जुबेर यांचा समावेश आहे. , शेख जमील आदींनी परिश्रम घेतले आहेत.

# भक्तीमुळेच आध्यात्मिक उन्नती – श्रीहरी महाराज नालेगावकर

## संत गोरोबाकाका पुण्यतिथी निमित्त किर्तन सोहळ्यासह महाप्रसादाचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**मंठा / प्रतिनिधी**

भगवंताची भक्ती करत असताना निस्वार्थ भाव व श्रद्धा ठेवून भगवंताचे नामस्मरण व चिंतन केल्याने आत्मिक समाधान प्राप्त होते.भक्तीमुळेच आध्यात्मिक उन्नती होत असून, चांगले व वाईट कर्म आपल्या हाती असल्याचा अमृतबोध हभप श्रीहरी महाराज मालेगावकर यांनी दिला.

संत श्री गोरोबाकाका महाराज पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित कीर्तनामध्ये निरूपण करतांना श्रीहरी महाराज बोलत होते.यावेळी जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज यांच्या अभंगावर त्यांनी विस्तृत निरूपण केले. याप्रसंगी पुढे निरूपण करताना श्रीहरी महाराज म्हणाले की , मनःशांतीबरोबरच मनः शक्ती वाढविण्यासाठी आध्यात्माचा मार्ग उपयोगी पडू शकतो. सुखात असो वा दुःखात आपण आपल्या श्रद्धा असलेल्या देवी- देवतांच्या अधीन होतो आणि सर्वकाही त्याला अर्पण करतो. ही श्रद्धा, ही भक्ती व्यक्तीला अधिक उन्नत होण्यास नक्कीच मदत करत असते, तसेच निःस्वार्थपणे आणि श्रद्धेने केलेले नामस्मरण आपल्या आयुष्याचा हा भवसागर तरून जाण्यास साह्य करते. आयुष्य म्हटले की, चढ-उतार हे आलेच. कधी हा चढ-उताराचा झोका आकाशाच्या उंचीवर घेऊन जातो, तर कधी अगदी स्वतःला स्वतःच्याही नजरेतून उतरवतो. या यशापयशाला, मानापमानांना समोर जाण्याची क्षमता प्रत्येकाची वेगवेगळी असू शकते. कुणी जीवनातील बदलांना धीराने समोर जातात, तर कोणी एखाद्या छोट्याशा धक्क्याने कोसळतात. म्हणून मनुष्य जन्म पार करण्यासाठी शरीराच्या सोबत मनाचे सशक्तीकरण आवश्यक आहे, असा अमृतबोध त्यांनी दिला. तसेच संताचा संघ आणि आनंदाचा कण वाया जाऊ देऊ नका , चिंतन करा , चिंतन करू नका , मुलावर संस्कार करा आई-वडिलांची सेवा करावी असे सांगितले. शहरातील साखळे परिवाराच्या वतीने कीर्तन सोहळा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिसरातील भाविक - भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.काळे यांच्या प्रचारार्थ मा.आ.संतोष सांबरे यांचा अंबड तालुक्यात झंझावात

**तभा वृत्तसेवा**
**अबंड /प्रतिनिधी**

पारनेर जिल्हा परिषद गटातील हरतखेडा, बठाण खुर्द, सारंगपूर, वाघलखेडा, पानेगाव, दहीपुरी, दुधपुरी, मसई, गोविंदपूर, नागझरी, मठपिंपळगाव, शेवगा, धनगर पिंपरी, पारनेर, मार्डी या गावांना भेटी देऊन शेतकऱ्यांशी गावकर्यांशी मा आमदार संतोष सांबरे यांनी संवाद साधला



याप्रसंगी राष्ट्रवादीचे नेते बबलू चौधरी, युवा सेना सचिव विनायक चोथे, शिवसेना तालुकासंघटक दिनेश काकडे, श्रीराम भाऊ जाधव, समर्थचे संचालक कैलासराव जिगे, बंडू पागिरे, राष्ट्रवादी युवती प्रदेश सरचिटणीस पल्लवीताई तारडे, अशोक गिरी, सिद्धेश्वर उबाळे, सुशीलकुमार रुपवते, नंदू पुंड, रमेश वराडे, गजानन सानप, विलास कचरे, संदीप नरोडे, बळीराम तोगे, जगन दुर्गे, लक्ष्मण आढाव, बद्रीनाथ पाटील, रावसाहेब पवार, अमोल टोपे, कैलास जारवाल, रवींद्र इंगळे, बाळू सपकाळ, किसनराव लेकुरवाळे, अशोक कदम, सुजित पांढरे, अमोल सोनवणे, अंकुश जाधव, शेर खान, अंबादास मुळे, नवनाथ जाधव, केदार सानप यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होत

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सध्या लोकसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. एकीकडे रखरखते ऊन आहे. जसा प्रचाराचा पार चढला आहे. तसा उष्णतेचा पारा ४२ अंशावर गेला आहे. अशा रखरखत्या उन्हात ना एसी... ना कुलर... ना हवा... यापैकी काहीच नसलेल्या पाला मधल्या राहणाऱ्या लोकांच्या झोपडीचे जळकोट-मानमोडी रस्त्यालगत उन्हाची काहिली सहन करत राहत असलेल्या नागरिकांचे भर दुपारी दीडच्या सुमारास टिकलेले छायाचित्र.(छाया : मेघराज किलजे, जळकोट)



# उस्मानाबाद लोकसभा मतदानासाठी प्रशासन सज्ज; मतदान पथके मतदान केंद्राकडे रवाना

## २१३९ मतदान केंद्र... २० लक्ष मतदार बजावणार मतदानाचा हक्क... २१३९ मतदान केंद्राध्यक्ष तर २६७५ मतदान अधिकारी... मतदानासाठी २१३९ बॅलेट युनिट...







**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मे -**

सात मे रोजी ४०-उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघासाठी मतदान होणार आहे. या लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा क्षेत्राच्या मुख्यालयातून मतदान केंद्रस्तरीय पथके आज ६ मे रोजी मतदानाचे साहित्य घेऊन मतदान केंद्राकडे रवाना झाली.

७ मे रोजी होणाऱ्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी औसा, उमरगा, तुळजापूर, उस्मानाबाद, परंडा आणि बार्शी विधानसभा क्षेत्रात एकूण २१३९ मतदान केंद्रावर २० लक्ष ४ हजार २८२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे. यामध्ये औसा- ३०७, उमरगा- ३१५, तुळजापूर- ४०६, उस्मानाबाद- ४१०, परंडा- ३७२ आणि बार्शी विधानसभा क्षेत्रातील ३२९ मतदान केंद्राचा यामध्ये समावेश आहे. २१३९ मतदान केंद्रासाठी २१३९ मतदान केंद्राध्यक्ष नियुक्त केले असून २५ टक्के केंद्राध्यक्ष म्हणजेच ५३६ राखीव आहेत. एकूण २६७५ मतदान केंद्राध्यक्ष असतील. या निवडणुकीसाठी ६४१७ मतदान अधिकारी नियुक्त केले आहे. १६०८ हे राखीव आहे. एकूण मतदान केंद्राध्यक्षाची संख्या ८०२५ आहे. मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी असे एकूण ७९२० जणांची नियुक्ती करण्यात आली असून १९८५ राखीव आहेत, असे एकूण ९९०५ मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त केले आहे.

उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघासाठी २१३९ मतदान केंद्र राहणार असून मतदान मतदानासाठी २१३९ बॅलेट युनिट, २१३९ कंट्रोल युनीट आणि २१३९ व्हीव्हीपॅट मशीन राहणार आहे. ६४० बॅलेट युनिट, ६४० कंट्रोल युनिट, ८५५ व्हीव्ही पॅट ह्या अतिरिक्त मशीन असतील. एकूण २७७९ बॅलेट युनिट, २७७९ कंट्रोल युनिट आणि २९९४ व्हीव्ही पॅट मशीन या निवडणुकीसाठी उपलब्ध आहेत.

एकूण २१३९ मतदान केंद्रापैकी २०१ केंद्र पडदानशीन, प्रत्येक विधानसभा मतदारसंघात महिला कर्मचारी संचालित प्रत्येकी एक मतदान केंद्र, दिव्यांग कर्मचारी संचालित प्रत्येकी एक मतदान केंद्र, युवा कर्मचाऱ्यांचे औसा विधानसभा क्षेत्रात ५ केंद्र तर उर्वरित मतदारसंघात प्रत्येकी एक मतदान केंद्र, मॉडेल मतदान केंद्र औसा-१, उमरगा-६, तुळजापूर-९, उस्मानाबाद -१३, परंडा-२३ आणि बार्शी विधानसभा मतदारसंघात दोन मतदान केंद्र आहे.

संवेदनशील मतदान केंद्र औसा-एक, उमरगा-एक, तुळजापूर-दोन, उस्मानाबाद-२, परंडा-१ आणि बार्शी विधानसभा क्षेत्रात आठ आहेत.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त धाराशिवात अभिवादन

**धाराशिव, दि.६ मे -**

आरक्षणाचे जनक लोक कल्याणकारी न्यायप्रिय शासनकर्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज ६ मे रोजी वतीने छत्रपती शाहू महाराज चौक येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष बलराज रणदिवे, मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख, शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे अध्यक्ष गौरव बागल, संभाजी ब्रिगेडचे आकाश मुंडे, बालाजी पाटील, कुणाल निंबाळकर, अभिजीत सूर्यवंशी, शुभम मुंडे, दादा पांढरे, अमर घोडके, अजय पाटील, नाना लष्करे इत्यादी यावेळी उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.



### कळंबमध्ये महायुतीच्या अर्चनाताई पाटील यांच्या प्रचारार्थ पदयात्रा

**कळंब, दि.६ मे -**

महायुतीच्या उमेदवार अर्चना राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी शनिवारी सायंकाळी पदयात्रा काढली. या पदयात्रेत भाजपा, राष्ट्रवादी, शिवसेना शिंदे गट, रिपाइं, लहुजी शक्तीसेना व इतर घटक पक्ष, संघटनांच्या पदाधिकार्यांना सोबत घेवून शहरात पदयात्रा काढली. या पदयात्रेत त्यांनी सामान्य नागरिकांसह विविध व्यावसायिकांशी संवाद साधला. महायुतीतील सर्वच पक्ष, संघटनांच्या पदाधिकार्यांसमवेत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी काढलेल्या पदयात्रेला जनतेकडून मिळालेला. चहाची टपरी, किराणा दुकान, मेडिकल, कपड्याचे व्यापारी, फळ विक्रेते, भाजीपाला विक्रेते, दूध विक्रेते आदी व्यावसायिकांशी आमदार पाटील यांनी संवाद साधला. यावेळी त्यांच्या पदयात्रेस मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

**खामसवाडी, दि.६ मे -**

आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे डॉ. आदिनाथ राजगुरू (संचालक, आयव्हीएफ कन्सल्टंट अक्षय हॉस्पिटल, धाराशिव), डॉ. फारूक तांबोळी (अयाजुल डेंटल क्लिनिक, बार्शी) डॉ.सुरज नन्नवरे (प्राचार्य, एसबीएनएम कॉलेज ऑफ फार्मसी,धाराशिव) यांची उपस्थिती होती. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शेख गाझी (प्राचार्य,आर.पी.कॉलेज ऑफ फार्मसी, धाराशिव) यांनी केले.

# आयएमए महिला डॉक्टर शाखेचा पदग्रहण सोहळा संपन्न

## अध्यक्षपदी कौशाली राजगुरू, उपाध्यक्षपदी डॉ. स्मिता गवळी तर सचिवपदी श्रध्दा मुळे...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मे -**

इंडियन मेडिकल असोसिएशन महिला डॉक्टर धाराशिव शाखेच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा नुकताच पार पडला. यात अध्यक्षपदाची सूत्रे डॉ. कौशाली राजगुरू तर सचिवपदाची सुत्रे डॉ. श्रध्दा मुळे यांनी स्वीकारली.

इंडियन मेडिकल असोसिएशनची महिला डॉक्टर शाखा ही राज्य पातळीवर काम करणारी संघटना असून, या माध्यमातून डॉक्टरांसोबतच समाजासाठीही आरोग्य विषयक विविध उपक्रम राबविले जातात. विशेषत: कोविड काळात आरोग्य विषयक सेवेसोबतच नागरिकांमध्ये जनजागृती करण्यातही संघटनेचा मोठा वाटा होता. येथील कार्यकारिणीची मुदत संपल्यामुळे पुढील दोन वर्षांसाठी नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली. जिल्हा शासकीय रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. शिल्पा डोमकुंडवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पदग्राहण सोहळा पार पडला.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. इस्माईल मुल्ला, आयएमए संघटनेचे अध्यक्ष डॉ. सचिन देशमुख, जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. सतीश हरिदास, आयुर्वेदिक महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नागनाथ गंगासागरे आदींची शुभेच्छापर भाषणे झाली.

यावेळी डॉ. डोमकुंडवार यांनी 'वैद्यकीय व्यवसाय आणि वैद्यकीय शिक्षणातील बदलते ट्रेंड' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉक्टरांनी वैद्यकीय क्षेत्रात होणाऱ्या नवनवीन बदलांची माहिती करून घेऊन स्वत:ला अपग्रेड ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास डॉ. कुलदीप मिटकरी, डॉ. अभय शहापूरकर, डॉ. स्मीता शहापूरकर, डॉ. आदिनाथ राजगुरू, डॉ. गणेश पोलावार, डॉ. कठारे, डॉ. घोगरे, डॉ. सुधीर मुळे, डॉ. सुशील चव्हाण, डॉ. पल्लवी कोथळकर यांच्यासह शहरातील अनेक डॉक्टर्स, तसेच रोटरी क्लबच्या अध्यक्ष डॉ. अनार साळुंके, रेखा ढगे, नीता कठारे, किरण देशमाने, सुरेखा जगदाळे आदी उपसत्रथित होते. प्रास्ताविक डॉ. कौशाली राजगुरू यांनी केले. आभार डॉ. श्रध्दा मुळे यांनी मानले.

### कार्यकारिणीत या डॉक्टरांचा समावेश...

आयएमए महिला कार्यकारिणीत उपाध्यक्ष डॉ. रजनी पाटील, डॉ. स्मीता गवळी, सहसचिव डॉ. नीता चौगुले-पौळ, खजिनदार डॉ. अश्विनी सरडे, राज्य प्रतिनिधी डॉ. मीना जिंतूरकर, डॉ. ज्योती कानडे, कार्यकारिणी सदस्य डॉ. वसुधा दापके-देशमुख, डॉ. रेखा टिके, डॉ. मंजुश्री राठोड-चव्हाण, डॉ. अश्विनी देशमुख.

# २ ते ५ मे दरम्यान ३९९८ दिव्यांग आणि ८५ वर्षावरील वयस्क नागरिकांनी घरीच बजावला मतदानाचा हक्क

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मे -**



उस्मानाबाद लोकसभा मतदार संघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दिव्यांग आणि ८५ वर्षावरील वयस्क मतदारांचे त्यांच्या घरी जाऊन पोस्टल मतपत्रिकेच्या माध्यमातून मतदान घेण्यात आले.

भारत निवडणूक आयोगाने प्रथमच दिव्यांग आणि ८५ वर्षावरील वयस्क नागरिकांचे मतदान त्यांच्या घरी जाऊन पोस्टल मतपत्रिकेच्या माध्यमातून करून घेतले. त्यामुळे या दिव्यांग व वयस्क मतदारांना दिलासा मिळाला. ज्या दिव्यांग आणि ८५ वर्षावरील वयस्क व्यक्तींना घरीच पोस्टल मतपत्रिकेच्या माध्यमातून मतदान करावयाचे होते, अशा ४४३२ व्यक्तींनी नमुना १२ ड निवडणूक विभागाकडे भरून दिला होता.



२ मे ते ५ मे २०२४ दरम्यान घरी जाऊन पोस्टल मतपत्रिकेच्या माध्यमातून मतदान घेण्याची मोहीम राबविली. यादरम्यान ४४३२ व्यक्तींपैकी ३९९८ व्यक्तींनी घरीच पोस्टल मतपत्रिकेच्या माध्यमातून मतदान केले.

यामध्ये ८५ वर्षावरील वयस्क असलेल्या ३१९२ व्यक्तींनी आणि ७८७ दिव्यांग व्यक्तीने मतदान केले. तसेच अत्यावश्यक सेवेतील १९ व्यक्तीनी देखील याच मोहिम दरम्यान मतदान केले.

पोस्टल मतपत्रिकेच्या माध्यमातून घरीच मतदान करून घेण्यात तिसऱ्या टप्प्यात उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघ राज्यात अव्वल ठरला आहे.

# भर उन्हात महायुतीच्या प्रचार सभेची सांगता

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ मे -**

नळदुर्ग शहरातील भर उन्हात महायुतीच्या प्रचार सभेची सांगता करण्यात आली. सर्व जाती-धर्मातील लोकांसाठी विकासाचे काम करणार्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा तिसर्यांदा प्रधानमंत्री करण्यासाठी नागरिकांनी महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नळदुर्ग येथे प्रचारसभेत बोलत होते.

नळदुर्ग येथे प्रचाराच्या शेवटच्या दिवशी रविवार, ५ मे रोजी उन्हात धाराशिव लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

जाहीर सभेपूर्वी शहरातील बाळकृष्ण मंदिर ते भवानी चौकापर्यंत रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये माजी नगराध्यक्ष उदय जगदाळे, नय्यर जहागीरदार, दत्तात्रय दासकर, माजी नगरसेंवक संजय बताले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्यांक सेलचे प्रदेश उपाध्यक्ष शफीभाई शेख, शहराध्यक्ष अजीज जुनैदी, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके, माजी नगरसेविका छमाबाई राठोड, सुशांत भूमकर, संजय विठ्ठल जाधव, पद्माकर घोडके, श्रमिक पोतदार, धीमाजी घुगे, सुनिल बनसोडे, सागर हजारे, अनिता रणे, मनसेचे प्रमोद कुलकर्णी, रिपाइंचे बाबासाहेब बनसोडे यांच्यासह शेकडो नागरीक सहभागी झाले होते. यामध्ये महिलांची संख्या मोठी होती. रॅली बाळकृष्ण मंदिर येथून निघाल्यानंतर शहरातील प्रमुख रस्त्यांसह मिरवणूक मार्गे निघून भवानी चौकात आल्यानंतर रॅलीचे विसर्जन करून याठिकाणी जाहीर सभा घेण्यात आली.

या सभेला आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी मंत्री बसवराज पाटील व युवा नेते सुनिल चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

# मोदींच्या नेतृत्वामुळे अर्थव्यवस्थेत आपला देश पाचव्या नंबरवर : कृषी मंत्री धनंजय मुंडे



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.६ मे -**

गेली दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्व देश प्रगती करीत असून जगातील पाच नंबरची अर्थव्यवस्था असलेला देश म्हणून पुढे येत आहे. याचा आपणास अभिमान वाटायला हवा यासाठी नरेंद्र मोदी यांना खंबीर साथ देण्यासाठी व जिल्ह्याच्या विकासासाठी महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांना विजयी करावे, असे आवाहन राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी धाराशिव मतदार संघातील महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई राणाजगजीतसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ होळकर चौक कळंब येथील प्रचार सभेत ४ मे रोजी बोलत असताना केले.

मुंडे यांनी आपल्या भाषणात गेल्या पाच वर्षात आपल्या मतदारसंघातील खासदाराने कोणती विकासाची कामे केली? कोणते उद्योग जिल्ह्यात आणले.

पंधरा हजार सुशिक्षित बेरोजगार तरुणाना रोजगार दिले का? असा प्रश्न विचारला मोदी सरकारने आयुष्यमान भारत योजना, गॅस कनेक्शन, लखपती दीदी योजना तसेच कोव्हीड काळात व्हॅक्सीन उपलब्ध करून एकदा नव्हे दोनदा लस देऊन जीवनदान दिले आहे. केंद्र सरकार शेतकऱ्यासाठी किसान सन्मान योजनेतून वर्षाला सहा हजार देत आहे. आता यात राज्य सरकार देखील सहा हजार रुपये प्रति वर्ष देणार असून यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यावर बारा हजार रुपये मिळणार आहेत. तर सोयाबीनसाठी आचारसंहिता संपल्यानंतर प्रति हेक्टरी पाच हजार रुपये, दोन हेक्टर पर्यंत साडेचार हजार कोटीचे पॅकेज देण्याविषयी सरकारने निर्णय झाला असून कापूस या पिकाविषयी निर्णय घेतला जाणार असल्याचे सांगितले ३० एप्रिल ला धाराशिव येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रचंड जाहीर सभा झाली. या सभेने अर्चनाताई पाटील यांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले आहे. देशाच्या विकासासाठी मोदींना साथ देण्यासाठी अर्चनाताई पाटील यांना आपण निवडून द्यावे असे आवाहन केले.

याप्रसंगी आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी आपल्या भाषणात गेली १९ वर्ष माझे व दहा वर्ष उमेदवार अर्चना पाटील यांचे काम पाहत आहात. शेतकऱ्यांसाठी न्यायालयीन संघर्ष करू पिक विमा मिळवून दिला. कृष्णा भीमा स्थिरीकरण योजनेतून मराठवाड्याच्या वाट्यातील २३.६६% पाण्यापैकी हक्काचे ७% पाणी पुढील वर्षापासून आपल्याला जिल्ह्याला मिळणार असल्याचे सांगितले. तसेच कोल्हापूर, सांगली येथील अतिरिक्त पाणी बंद बोगद्यातून जिल्ह्याला उपलब्ध होणार आहे. तसेच एमआयडीसीच्या माध्यमातून रोजगार व आई तुळजाभवानी मंदिराचा कायापालट करणार असून वैश्विक दर्जाचे पर्यटन स्थळ बनणार आहे. राज्य सरकारच्या मान्यते बरोबर केंद्र सरकारची मदत घ्यावी लागणार आहे. यामुळे जिल्ह्याच्या कायापालट होणार आहे असे सांगितले.

मंचावर राष्ट्रवादी काँग्रेसचे सुरेश पाटील, शिवसेनेचे अनिल खोचरे, सागर मुंडे, बिपिन हौसलमल, आशा भवर, सरला खोसे, ॲड. शकुंतला फाटक, दत्ता तनपुरे, बंडू बनसोडे महायुतीच्या कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ग्रामीण भागातील तरुण 'ऑनलाईन' जुगाराच्या विळख्यात

**तभा वृत्तसेवा**
**फुलवळ, ६ मे -**

कंधार तालुक्यातील शहर तसेच ग्रामीण भागात नवनवीन 'फॅशन ट्रेंड' दिवसागणिक मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे असून तरुण पिढी इंटरनेट आणि फोनच्या इतकी आहारी गेली आहे की, या तरुणांना त्याचे एक प्रकारे व्यसनच जडले आहे. आज प्रत्येक तरुणाकडे 'स्मार्टफोन' आहे. त्यामध्ये इंटरनेटवर चालणारे अनेक प्रकारचे 'ऑनलाईन' खेळ (गेम) असतात. या खेळांनी तरुणांना अक्षरशः वेड लावले आहे. 'ऑनलाईन' रमी, सुडुको, तीनपत्ती (पत्त्यांचा एक प्रकार), क्रिकेट सामन्यांसाठी( ड्रीम ११) 'ऑनलाईन' संघ सिद्ध करणे, 'कॅण्डी क्रश', 'ब्ल्यू व्हेल', 'अँग्री बर्ड', 'पोकेमॉन', 'पब्जी' असे खेळ इंटरनेटवर धुमाकूळ घालत आहेत.

आजच्या आधुनिक युगात सध्या फोन हा प्रत्येकाच्या जीवनाचा एक भाग बनला आहे, त्यात वेगवेगळ्या सिम कार्ड कंपन्यांनी प्रतिदिन १.५ ते २ 'जीबी डेटा'काही दिवस मुक्त मध्ये देऊन तरुणांना भुरळ घातल्याचे पहावयास मिळत आहे. सध्या भारतामध्ये आयपीएल क्रिकेटचे सामने चालू आहेत. त्यामध्ये ड्रीम ११ ऑनलाइन गेम चा वापर करून त्यातून घरबसल्या पैसा कमावता येऊ शकतो, हे सगळ्यांना आकर्षित करत असल्याचे जाणवत आहे. त्यासह तीनपत्ती, रम्मी, लुडो यांची जाहिरातही अभिनेते, क्रिकेटपटू करत असल्यामुळे तरुण अधिक प्रमाणात त्याला बळी पडत आहेत.

१७ ते ४० वर्षातील ४ नवतरुण सार्वजनिक ठिकाणी एकत्र येत 'स्मार्टफोन'वर 'लुडो' खेळतांना दिसत आहेत. इंटरनेटच्या युगात एका क्लिकवर हे तरुण तासन् तास खेळाच्या सुखात मग्न होतांनाचे चित्र दिसत आहे. ग्रामीण भागामध्ये या ऑनलाइन गेम च्या आहारी गेल्या नवतरुणामुळे रोजगारांचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर उद्भव आहे. शेतीमध्ये शेत काम करण्यासाठी सहजासहजी कामगार उपलब्ध होताना दिसून येत नाहीत.

केवळ तरुणच नव्हे, तर आजी, आजोबा, नातवंडे, आई आणि बाबा यांच्यातही 'लुडो' खेळाचा डाव चांगलाच रंगू लागला आहे. स्मार्टफोनमध्ये असलेल्या 'लुडो' या खेळाचे खूळ सध्या शहरासह गावखेड्यात वाऱ्यासारखे पसरले आहे. पूर्वी लहान मुलांच्या मनोरंजनासाठी खेळ खेळला जायचा; मात्र तरुणांमध्येही त्याची 'क्रेझ' मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

लुडो हा खेळ भटकण्याचा नसला, तरी त्याने तरुणांना तहानभूक विसरायला लावली आहे.

स्मार्टफोनचा शोध लागण्यापूर्वीही समाजात जुगार अस्तित्वात होता; मात्र जुगार खेळणे, लॉटरी या गोष्टी सहज होत नव्हत्या. विविध भाषा मधील विविध 'ॲप'च्या माध्यमातून जुगार खेळणे अधिक सोपे झाले आहे. 'खेलो और जीतो', 'खेलो और पाओ' किंवा 'खेळा आणि भरपूर जिंका', अशा मथळ्याखाली मोठमोठी आश्वासने देत असतात.

ऑनलाईन जुगाराविषयी सरकारचे धोरणच नाही, त्यामुळे तो फोफावत आहे.

महाराष्ट्र सरकारने अजून या जुगारावर कायद्याने बंदी घातलेली नाही. या जुगारामागचे चित्र फार विदीर्ण आणि भीषण आहे. नोकरी करणारे अनेक नागरिक हे जुगाराच्या नादी लागून कर्जबाजारी झाले आहेत. अनेक लोक गुन्हेगारी मार्गाला लागले आहेत. कित्येक तरुण मुलांनी आत्महत्या केल्या आहेत. अशी किती कुटुंबे देशोधडीला लागली असतील ? याची गणती नाही. जुगाराचे व्यसन लागलेल्या व्यक्तीला योग्य वेळी समुपदेशन न केल्यास हे दुष्टचक्र चालूच रहाते.

हातातील स्मार्टफोनमुळे आपण 'स्मार्ट' (हुशार) झालो असलो, तरी हाच स्मार्टपणा असा धोकादायक ठरू शकतो, याकडे सर्वांनी सर्वांनी गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

# देगलुरात आयपीएलच्या सट्ट्याने धरला वेग

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, ६ मे -**



गेल्या दीड महिन्यापासून शहर व परिसर अवैध सट्टेबाजाराच्या विळख्यात सापडला आहे. या माध्यमातून आयपीएलवर दररोज लाखोंची उलाढाल होत असताना येथील पोलीस यंत्रणा कुठलीच कावाई करत नसल्याने पोलीस देखील यात हिस्सेदार आहेत की काय ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

शहरात सुरुवातीला देगाव नाका जवळील एका गल्लीतून हा सट्टा केंद्र चालविला जात होता. कालांतराने या सट्टे बाजाराचे लोन आजूबाजूच्या तालुक्यासह सीमेपलीकडील भागात पसरवीत मुख्य भागात बुकी नेमले आहेत. कमी कालावधीत लाखो कमविण्याच्या लालसेने अनेक तरुण ऑनलाइन जुगाराच्या विळख्यात सापडले आहेत. गेल्या दीड महिन्यापासून चालू असलेला हा आर्थिक जीवघेणा जुगार येथील डीबी शाखेत गेल्या तीन-चार वर्षापासून कार्यरत असलेल्या पाच अक्षरी आडनाव असलेल्या कर्मचाऱ्याच्या कृपादृष्टीने चालू असल्याची चर्चा होत आहे.

अजून २० ते २१ दिवस आयपीएलचा हंगामा चालू राहणार आहे. यादरम्यान क्रिकेटवर मोठ्या प्रमाणात ऑनलाइन सट्टा लावण्याची दाट शक्यता आहे. आता याचे केंद्र तेलंगणा सीमा भागात हलविण्यात आले आहे. मोठ्या बुकिनी गावागावात काही व्यक्ती नियुक्त करून ते सट्टा खेळणाऱ्याला ऑनलाइन लिंक पुरवित असल्याची माहिती पुढे येत आहे. या माध्यमातून साहजिकच प्रत्येक सामन्यावर लाखो रुपयांची उलाढाल होण्याची शक्यता आहे. झटपट श्रीमंत होण्याच्या नादात अनेकजण कर्ज बाजारी झाले आहेत. तर सट्टा चालविणारे अल्पावधीतच मालामाल झाल्याचे चित्र आहे. या गंभीर बाबीकडे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी लक्ष घालून सट्टेबाजारांना आवर घालावी तसेच यास पाठबळ देणाऱ्या डीबी शाखेतील कर्मचाऱ्यांची तात्काळ उचल बांगडी करावी अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### रुग्णांना फळे वाटप व वृक्षारोपण करत वाढदिवस साजरा

**हदगाव -** चढत्या उन्हाचा पारा आणि भविष्यात वाढणाऱ्या उन्हाची तिव्रता लक्षात घेऊन हदगाव तालुक्यातील अनेक वाडी - तांड्यात गोर सेनेच्या कार्यकर्त्यांनी वृक्षरोपण व उप जिल्हा रुग्णालय हदगाव येथे रुग्नांना फळे वाटप करून गोर सेना तालूका अध्यक्ष रविकुमार चव्हाण यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. वाढदिवसाला होणार व्यर्थ खर्च टाळून पर्यावरणाला वाचवण्यासाठी वृक्ष लागवड करणे सर्वांचे कर्तव्य आहे आणि या पुढे सर्वांनी आप आपल्या वाढदिवसाला किमान पाच झाडे लावावीत असे या वेळी गोर सेनेच्या कार्यकर्त्यांनी ठरविले आहे. येणाऱ्या काळात गोर सेने कडून पाच हजार वृक्ष लागवड करण्याचा निर्धार केला आहे असे या वेळी सांगण्यात आले.

### शिष्यवृत्ती परिक्षेत मॉडर्नच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**उमरी -** महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुण्याच्या वतिने घेण्यात आलेल्या इयत्ता पांचवीआणि आठवीच्या शिष्यवृत्ती परिक्षेत मॉर्डन इंग्लिश स्कूल उमरीच्या दहा विद्यार्थ्यांनी पात्रता प्राप्त केली आहे. त्यामध्ये इयत्ता ५ वीतील अर्पित माने, माही असावा, ममताश्री शिंदे. इयत्ता ८ वीतील शर्वरी तम्मेवार, वैभवी यम्मेवार, अक्षरा बिजमवार, सोनल सुरबुलवाड, शौर्य उत्तरवार आणि आशुतोष कदम ह्या विद्यार्थ्यांनी पात्रता प्राप्त केली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनुराधा संजय कुलकर्णी यांनी अभिनंदन केले आणि शाळेच्या सर्व शिक्षक सहकार्यांनी विषेश परिश्रम घेऊन मॉर्डन इंग्लिश स्कूलची यशस्वीतेची परंपरा कायम राखल्याबध्दल स्टाफचे देखिल कौतुक केले.

### शेतकऱ्याच्या बैलजोडीची चोरी

**मुदखेड -** मुगट येथील एका शेतकऱ्याची बैलजोडी आखाड्यावरून चोरी गेल्याची घटना घडली. मुगट येथील शेतकरी भास्कर चोखोबा गोडबोले राहणार इंदिरानगर नांदेड येथील रहिवाशी असून त्यांची शेती मुदखेड तालुक्यातील मुगट येथे असुन दि. ३ मे रोजी संध्याकाळी सात वाजता सुमारास ८० हजार किमतीचे बैल जोडी चोरट्याने आखाड्यावर बांधलेले बैलजोडी चोरून नेल्याची घटना घडली. सध्या नांदेड जिल्ह्यात जनावर चोरी करण्याची टोळी तैनात झालाअसून शेतकऱ्यांच्या शेतातील बैल जोडी असो किंवा जनावर चोरून नेण्याचा प्रकार वारंवार घडत असल्याचे शेतकरी सांगतात. सदर बैल जोडी हे तांबड्या रंगाची असून शेपुट काळा, शिंग उभे असुन शेतकरी भास्कर चोखोबा गोडबोले यांनी दिलेल्या तक्रारीवरून मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शिष्यवृत्ती परीक्षेत गुरुकुल पब्लिक स्कूलचे विद्यार्थी चमकले



**नरसी फाटा -** पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षांच्या नुकत्याच आलेल्या निकालात नायगाव शहरातील गुरुकुल पब्लिक स्कूल च्या ८ विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप परिक्षा पात्र करून बाजी मारली आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र आभिनंदन होत आहे. गुरुकुल पब्लिक स्कूल हे गेल्या अनेक वर्षांपासून शहरात विविध शैक्षणिक उपक्रमासह सामाजिक, सांस्कृतिक क्टीविटी मध्येही मुलांची जडणघडण घडवून अणाणरी शाळा म्हणून अल्पावधीत नावरूपाला आली आहे. सन २०२३ -२४ या शैक्षणिक वर्षात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात या शाळेने प्रथम क्रमांक मिळविला होती. त्यानंतर आता नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या स्कॉलरशिप परीक्षेतही गुरुकुल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. त्यात शाळेतील श्रीकर रघुनाथ सूर्यवंशी, सानवी संतोष कल्याण, सचिन सुभाषराव बेंद्रीकर, अवनी शरद कदम, तनवी प्रदीप करमाळे, कृष्णा विजय पवार, सिद्धांत विजय गाडले, आराध्या संतोष मोरे या विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप परीक्षेत आपली पात्रता सिद्ध केले आहे. या त्यांच्या यशस्वी भरारी बद्दल शाळेचे सर्व शिक्षक व कर्मचारीवृदांसह मुख्याध्यापक स्वाती कल्याण मॅडम, संस्थेच्यावतीने संस्थेचे सचिव संतोष पाटील कल्याण यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्याना पुढिल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### जिल्हाधिकारी कार्यालयात पेन्शन अदालत

**नांदेड -** जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी मे २०२४ महिन्याच्या दुसऱ्या मंगळवार ७ मे २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

# कदमाची वाडी येथील ग्रामस्थांचा मतदानावर बहिष्कार

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ६ मे -**

गत विधानसभा निवडणूक प्रारंभी कदमाची वाडी येथील ग्रामस्थांनी दगडसांगवी, कदमाचीवाडी, कुरुळा हा रस्ता डांबरीकरण करून नदीवर पुलाचे बांधकाम करण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार घातला होता. तेव्हापासुन लोकप्रतिनिधीं किंवा शासनाकडुन या मागणीची पुर्तात केली नाही. मागीणी करुनही ५वर्षाचा काळ संपुष्टात आला. परंतु मागणी मान्य झाली नसल्यामुळे कदमाची वाडी येथील ग्रामस्थांनी लातूर लोकसभा मतदारसंघात ७ मे रोजी होणाऱ्या निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्धार केला आहे.

लोहा तालुक्यातील कदमाची वाडी येथे एकूण ५७७ मतदार आहेत. त्यापैकी ३१५ पुरुष तर २६२ महिला मतदार आहेत. सदर गाव लातूर लोकसभा मतदारसंघात तर लोहा कंधार विधानसभा मतदारसंघ समाविष्ट आहे. हा भाग डोंगराळ व आडवळणी दऱ्या खोऱ्यात आहे. तालुक्याला अथवा इतर गावांना जाण्यासाठी कदमाची वाडीवासीयांना चांगला रस्ता नाही. त्यामुळे दगड सांगवी - कदमाची वाडी-कुरुळा रस्ता डांबरीकरण करून नदीवर पुलाचे बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी पाच वर्षांपासून लावून धरली. या गावातील लोकांना पावसाळ्यात येण्या-जाण्यासाठी आडचण होत असल्यामुळे ग्रामस्थांनी एकमुखी ठराव घेत २०१९ मधील सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकला होता. मात्र ५ वर्षांत शासनाकडून दगडसांगवी कदमाची वाडी-कुरुळा या प्रमुख रस्त्यासंदर्भात कुठलाच निर्णय घेण्यात आला नाही. त्यामुळे गावकऱ्यांनी लातूर लोकसभा मतदारसंघात ७ मे रोजी होणाऱ्या निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

कदमाची वाडी येथील गावकऱ्यांची समजूत काढून त्यांना मतदान प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार, तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न सुरू आहेत. दि. ४ मे रोजी तहसीलदार परळीकर यांनी कदमाची वाडी येथे गावकऱ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला असल्याचे नायब तहसीलदार संजय भोसीकर यांनी सांगितले.

# पशुपालकांनी पशुंना जपावे : डॉ. बोधनकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ६ मे -**



उन्हाची दाहकता आता वाढली आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत अपुरा चारा व निकृष्ट आहारामुळे जनावरे अशक्त बनून त्यांची प्रतिकारशक्ती कमी होते. ते विविध रोगांना बळी पडतात. त्यामुळे पशुपालकांनी गुरांना जपावे असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. भुपेंद्र बोधनकर यांनी केले आहे.

उन्हाळ्यात गुरांना हिरवा चारा मिळत नाही. परिणामी, त्यांना विविध आजारांचा सामना करावा लागतो. तालुक्यात उन्हाचा चटका आता वाढत आहे. त्यांना सावली व चारापाणी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. गुरांना जपण्यासाठी त्यांचे लसीकरण करून घेण्यासोबतच त्यांचा उन्हापासून बचाव करणेही गरजेचे आहे. जनावरांना लाळ खरकत, घटसर्प, फऱ्या रोगाची लस टोचावी. परोपजीवी जंतूंचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी जंतुनाशक औषधे पाजावीत. गाभण जनावरे व दूध उत्पादक जनावरांची विशेष काळजी घ्यावी. जनावरांचा गोठा व परिसर स्वच्छ असावा. मलमूत्राची व्यवस्थित विल्हेवाट लावावी, असा सल्ला पशुतज्ज्ञांकडून दिला जात आहे. गुरांना उष्माघाताचे अक्षण आढळल्यास तत्काळ पशुवैद्यकांचा सल्ला घ्यावा. वाढत्या उन्हापासून गुरांचा बचाव करण्यासाठी पशुपालकांनी काळजी घ्यावी. गुरांना उन्हात बांधू नये. उन्हाचा झळा लागू नये याची काळजी घ्यावी. सावलीची व्यवस्था करावी. गुरांच्या चारापाण्याकडे लक्ष द्यावे. तसेच गुरांना उन्हाळ्यात पाच ते सहा वेळा पाणी पाजावे असे आवाहन डॉ. भुपेंद्र बोधनकर यांनी केले आहे.

# सोनाली मोळके हिने पटकावला आदिवासी कोळी महादेव समाजात पहिली डॉक्टर होण्याचा मान

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर, ६ मे -**

जिद्द व चिकाटीच्या जोरावर निमगाव (ता अर्धापूर) येथील आदिवासी कोळी महादेव समाजातील पहिली महिला डॉक्टर होण्याचा मान सोनाली मोळके हीने पटकावला आहे. तिच्या यशाचे कौतुक नागरिकांकडून होत आहे.

निमगावात आदिवासी कोळी महादेव समाज खूप मोठ्या संख्येने राहतो. या समाजाची शैक्षणिक प्रगती होत असुन येथील तरुण वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी वाटचाल करीत आहेत. तसेच हा समाज शिक्षणाच्या प्रवाहात येत आहे.

निमगाव येथील सोनाली गिरीधारी मोळके हीच जन्म एका शेतकरी कुटुंबात झाला. कुटुबांत शैक्षणिक वातावरण असल्याने तिची ओढ शिक्षणाकडे लागली. तीचे प्राथमिक शिक्षण निमगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. तर माध्यमिक शिक्षण नांदेड येथील प्रतिभा निकेतन माध्यमिक शाळेत झाले. तीने दहावी व बारावीच्या परीक्षेत चांगले घेतलें होतें. तिने डॉक्टर होण्याचे स्वप्न बाळगले होते.

वैद्यकीय शिक्षण प्रवेश पात्रता परिक्षेची तयारी सुरू केली. या प्रतिक्षेत चांगले गुण मिळाले. वैद्यकीय शिक्षणासाठी पुणे येथील बी.जे.ससून वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला. या वैद्यकीय महाविद्यालयात तिनें पुर्ण केले आहे.काही दिवसांपूर्वी पदविदान समारोह संपन्न झाला.

तिच्या यशाचे गावांसह व पंचक्रोशीतील गावातील नागरिकांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. यावेळी गावातील सेवा सहकारी सोसायटीचे माजी अध्यक्ष दगडुजी जगताप, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष गंगाराम झुडपे, संजय घोरपडे, पांडुरंग मोळके, वसंतराव चव्हाण, माजी उपसरपंच बालाजी जगताप, राधेश्याम पारीख, गणेश गोमासे पाटील, नागोराव गोमासे पाटील, साहेबराव मोरे, जी. पी. सुर्यवंशी, बालाजी पन्नासे, पत्रकार दिगंबर मोळके, अनिल मोळके आदी उपस्थित होते.

आमच्या कुटुंबात शैक्षणिक वातावरण होते. मी डॉक्टर होण्याचे स्वप्न बाळगले व ते साकार करण्यासाठी आभ्यात सातत्य ठेवले. मला आई-वडीलांनी प्रोत्साहन दिल्याने माझे डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार झाले आहे अशा भावना सोनिली मोळके यांनी व्यक्त केल्या.

# ईस्लापूर येथील जल जीवन मिशनच्या कामामुळे नागरिक त्रस्त



**तभा वृत्तसेवा**
**ईस्लापूर, ६ मे -**

गावामध्ये जाणारा मुख्य रस्ता फोडून जलजीवन मिशनचे काम चालू आहे पण त्या कामामुळे येथील ग्रामस्थांना खूप त्रास सोसावा लागत आहे. येथील संबंधितांना वारंवार सांगून सुद्धा मुख्य रस्त्यावरील खोदलेली नाली हे अर्धवट बुजून उर्वरित दगड माती ही अद्यापही काढलेली नाही यामुळे ये-जा करण्या करीता नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे.

शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजनांच्या माध्यमातून अंतर्गत रस्ते विकासाची कामे पूर्णत्वास गेली. गेल्या अनेक वर्षाचा रस्त्याचा वनवास संपला म्हणून ईस्लापूर येथील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. आता चांगल्या रस्त्यावरून जल जीवन मिशन अंतर्गतची प्रभावी सार्वजनिक नळ योजना मंजूर झाली. या योजनेचे काम चालू झाल्यानंतर पाईपलाईन खोदकाम म्हणून गावातील रस्ते खोदून पाईपलाईन टाकण्यात आली. परंतु खोदलेल्या रस्त्यावरून चालतांना येथील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या खोदकाम केलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हे पाणीपुरवठ्याच्या ठेकेदाराकडे आहे. आता येणारा पावसाळा एका महिन्यावर येऊन ठेपला आहे. नळ योजनेचे काम अपूर्ण असल्यामुळे आता रस्ते दुरुस्तीचे काम केंव्हा होणार आहे असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. या बाबीकडे वरिष्ठांनी तात्काळ लक्ष घालून येथील पाणीपुरवठा योजनेच्या थांबलेल्या कामाला पावसाळ्या अगोदर पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित गुत्तेदारांना देऊन तातडीने खोदलेल्या रस्त्याचे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी व जल जीवन योजनेचे चालू असलेले काम पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना द्याव्यात अशी मागणी ईस्लापूर येथील नागरिकांतून केली जात आहे.



**मुखेड - शहरात उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे नागरिकांना घराच्या बाहेर पडणे अशक्य झाले आहे. सोमवारी मुखेड येथे आठवडी बाजार असताना आठवडी बाजारात शुकशुकाट दिसून आला आहे. नागरिकांना भाजीपाला विक्री करण्यासाठी मोठी कसरत करावी लागली आहे. (छाया- हाफीजखान पठाण, मुखेड)**

# विजेच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ६ मे -**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी दिनांक ६ मे २०२४ रोजी दुपारी १ वाजता दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दिनांक ६ व ७ मे २०२४ हे दोन दिवस येलो अलर्ट जारी केलेला आहे. दिनांक ६ व ७ मे २०२४ ह्या दोन दिवसांच्या काळात जिल्ह्यात एक किंवा दोन ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. खबरदारीची उपाययोजना म्हणून खालील प्रमाणे काळजी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी केले आहे.

# लाखो रुपये खर्चून उभारलेल्या पाणी फिल्टर मशीन पडल्या धुळखात

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, ६ मे -**

तालुक्यातून सन २०१८ते सन २०२० या कालावधी २२ ग्रामपंचायतीने १४ वा वित्त आयोगाचे लाखो रुपये खर्च करून गावातील नागरिकांच्या आरोग्यासाठी पी आर ओ पिण्याच्या पाण्यासाठी पाणी फिल्टर मशीन खरेदी करून काही दिवसा करिता त्याद्वारे शुद्ध फिल्टर पाणी नागरिकांना पुरविण्यात आले परंतु आता ह्या अनेक ठिकाणच्या मशीन बंद पडल्याने अनेक नागरिकांचे पि.आर.ओचे पाणी पिण्याचे स्वप्न भंगले आहे परंतु संबंधित ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, ही मशीन दुरुस्त करून नागरिकांना पुरविण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांतुन खेद व्यक्त केला जात आहे.

तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत इसवी सन २०१७ मध्ये १४ वा वित्त आयोगाचे लाखो रुपये खर्च करून नागरिकांच्या आरोग्यासाठी पी आर ओ शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी मशिनी खरेदी करण्यात आल्या व त्याद्वारे जवळपास अंदाजे १२० ते १३० ग्राहकांना प्रति बॉटली२० लिटर पाच रुपये प्रमाणे विक्री करण्यात येत होती परंतु कालांतराने अवघ्या काही दिवसात या मशीन बंद पडल्याने नागरिकांच्या आरोग्यासाठी लागणारी शुद्ध पि आर ओ पाणी मिळणे मुश्किल झाले नाईला जास्तव पी आर ओ पिण्याच्या पाण्याची लागलेली सवय अनेकांना बंद करता आली नसल्याने खाजगी मालक धारकाकडून पिण्याकरिता पि.आर. ओ पाण्याची खरेदी करावी लागत आहे परंतु चौदाव्या वित्त आयोगातून लाखो रुपये खर्च करून गावकऱ्यांच्या आरोग्या करिता उभारण्यात आलेल्या बंद पडलेल्या पीआरओ मशीन संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी, पदाधिकारी जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याची खंत नागरिकातून ऐकावयास मिळते. याच प्रकारे हिमायतनगर तालुक्यातून चौदावा वित्त आयोग खर्च करून २२ ग्रामपंचायतीने नागरिकांच्या आरोग्यासाठी पी आर ओ मशीन खरेदी करण्यात आल्या होत्या त्यातील अनेक मशीन धुळखात पडून असल्याचेही जाणकारांच्या तोंडून ऐकावयास मिळत आहे परंतु त्या बाबतीत दुरुस्त करण्याकरिता ग्रामविकास अधिकारी व सरपंच यांची उदासीनता दिसून येत असल्याचे बोलल्या जात आहे.



खाजगी पी आर ओ पाणी बॉटल साठी २५ ते ३० रुपये मोजावे लागत आहे तर सर्वांच्या सोयीसुविधीसाठी असलेली लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या पाणी प्लांटला काही प्रमाणात खर्च करून दुरुस्त केल्यास गोरगरीब नागरिकांचे पि.आर.ओचे शुद्ध पिण्याच्या पाण्याचे स्वप्न निचितच साकार होईल अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली आहे.